cmyk

## संपादकीय

### भाजपनेही गिरविला घराणेशाहीचा कित्ता...

सध्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने घराणेशाहीची सांगड घालावी लागेल. काँग्रेससह अन्य पक्षांवर घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या भाजपने विधानसभेसाठी रविवारी जाहीर केलेल्या ९९ उमेदवारांच्या पहिल्या यादीवर घराणेशाहीचा पगडा दिसून येतो. दुसऱ्याच्या वाटातील कुसळ दिसणाऱ्या भाजपला स्वतःच्या ताटातील मुसळ दिसत नसेल हा भाग वेगळा. शिवाय ते साहजिक आहे. भाजपने पहिल्या यादीत ७१ विद्यमान आमदारांना वा मातब्बर राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांना तिकिटे दिली आहेत.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### नांदेड, हिंगोली जिल्ह्यांना भूकंपाचे धक्के

नांदेड/हिंगोली : नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यांना मंगळवारी (२२) सकाळी ०६:५२ मिनिटांच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. यासंदर्भात जिल्हा आपत्कालीन केंद्रानेही माहिती दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार या भूकंपची तीव्रता रिष्टर स्केलवर ३.८ एवढी नोंदवण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे, भूकंपाचा केंद्रिंबदू नांदेड शहरापासून २९ किमी दूर उत्तरपूर्व दिशेला हदगाव तालुक्यातील सावरगाव येथे होता. या धक्क्यामुळे कुठलीही जीवित वा वित्त हानी नसल्याची प्राथमिक माहिती जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्राला प्राप्त झाली असल्याचे नांदेडमधील जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्र, जिल्हाधिकारी कार्यालयाने म्हटले आहे.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१८१ | बुधवार, दि.२३ ऑक्टोबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# कापसाच्या नुकसानीकडे विमा कंपनीची डोळेझाक



## मान्सूनोत्तर पावसाने पिकांचे नुकसान, शेतकरी हवालदिल

**पुणे । प्रतिनिधी**

परतीचा पाऊस निघून गेला असला तरी मान्सूनोत्तर पावसाने चार-पाच दिवसांपासून राज्याच्या अनेक भागात विशेषतः मराठवाडा, विदर्भात दाणादाण उडवली आहे. दररोज होणाऱ्या पावसामुळे कापसांसह अन्य पिकांचे नुकसान सुरू असून शेतकरी नुकसान झाल्याबाबत पीकविमा कंपनीला तक्रारी करत असताना त्याकडे कंपनीकडून डोळेझाक होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

नुकसान झाल्याबाबत कळवल्यावर विमा कंपनीचा प्रतिनिधी तसेच कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यांनी पाहणी करणे अपेक्षित असताना प्रत्यक्ष पाहणीकडे दुर्लक्ष होत असल्याचे शेतकरी सांगतात. खरिपाची पिके चांगली आली आली असतानाच आणि कापूस वेचणीला आला असताना पाऊस झाल्याने फुटलेल्या कापसाला बाधा निर्माण झाली आहे. बोंडाबाहेर आलेला कापूस पावसाने काळा पडला आहे. त्यामुळे दरात फटका बसण्याची भीती शेतकरी व्यक्त करीत ◀◀ पान २ वर

# सत्ता परिवर्तनाची चाहूल लागताच नेत्यांच्या प्रवेशउड्या!




## ज्योतीताई मेटे यांच्यानंतर राजेंद्र मस्केंचा शरद पवार गटात प्रवेश ; आ.लक्ष्मण पवार, जयदत्त क्षीरसागर, रमेश आडसकर, मोहन जगताप, कुंडलिक खांडे वेटींगवर







**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यातील जनतेचा मुड आणि सत्ता परिवर्तनाची चाहूल लागल्याने बीड जिल्ह्यासह राज्यातील महायुतीचे बडे नेते मविआकडे उड्या मारत असल्याचे चित्र आहे. बीड जिल्ह्यातील आ. लक्ष्मण पवार, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, रमेश आडसकर, मोहन जगताप, कुंडलिक खांडे हे नेते सध्या वेटींगवर असून शिवसंग्रामच्या नेत्या डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या नंतर आता भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस (एस.पी.) आपल्या समर्थकांसह प्रवेश केला.**

राज्यातील सत्ता कायम राहावी यासाठी महायुतीकडे आटोकाट प्रयत्न केले जात असून लाडकी बहिण योजनेसह इतर योजनांची अमलबजावणी प्रभावीपणे राबवण्यात येत आहे. लाभकारी योजना आणि बड्या नेत्यांच्या जोरावर पुन्हा सत्तेत येण्यासाठी महायुतीचा प्रयत्न सुरु आहे. तर दुसरीकडे जरांगे ◀◀ पान २ वर

### कुंडलिक खांडेंना मातोश्रीने प्रवेश नाकारला?

शिंदे शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश करण्यासाठी तगडी फिल्डींग लावली असल्याचे समजते. मात्र खांडे यांच्यासाठी मातोश्रीचे दरवाजे कायमचे बंद असून त्यांना पक्ष नेतृत्वाने प्रवेश नाकारला असल्याची चर्चा आहे. त्यामुळे खांडे हे तुतारी हाती घेतील, असेही म्हटले जात आहे.

### जरांगे भेट अन् पवारांच्या पक्षात प्रवेश, हा योगायोग का?

डॉ. ज्योतीताई मेटे यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतल्यावर काही तासांमध्ये शरद पवारांच्या पक्षात प्रवेश केला. त्याबरोबरच भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सुध्दा जरांगे पाटलांची भेट घेतल्यावरच पवारांच्या पक्षात प्रवेश केला. त्यामुळे शरद पवारांच्या पक्षात करण्यापुर्वी आंतरवलीची मर्जी घ्यावी लागते, पुन्हा स्पष्ट झाले आहे. त्यामुळे जरांगे पाटलांची भेट आणि त्यानंतर पवारांच्या पक्षात प्रवेश हा निव्वळ योगायोग समजायचा का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

# नर्मदा सॉलवेंट एक्स्ट्राक्शन एलएलपीचा गैरव्यवहार उघड

## बारा लाखांच्या प्लॉटवर ४० कोटीचे कर्ज; केंद्रीय अन्वेषण विभागाकडे तक्रार दाखल



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील खानापूर ग्राम पंचायत हद्दीतील बारा लाख रुपये बाजारमूल्य असलेल्या एका प्लॉटवर केनरा बँकेच्या अधिकाऱ्यांशी संगणमत करत नर्मदा सॉलवेंट एक्स्ट्रक्शन एल एल पी चा ४० कोटी रुपयांचे कर्ज उचलत बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग मुंबईकडे रामेश्वर जोतिबा उदमले यांनी तक्रार दाखल करत चौकशीची मागणी केल्याने नर्मदा सॉलवेंट एक्स्ट्राक्शन एलएलपी च्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता दिसत आहे.

२०१४ पासून महाराष्ट्रात केंद्रीय अन्वेषण विभाग संस्थेच्या माध्यमातून अनेक उद्योगपतींच्या वेगवेगळ्या स्तरावर चौकशा करण्यात आलेल्या आहेत.अनेक उद्योगांना आर्थिक गैरव्यवहार आणि सुरळीत व्यवहाराची ताळमेळ जुळत नसल्याने अनेक प्रकरणात गैरव्यवहार आढळून आल्याने या विभागाकडून टाळे ठोकण्यात आलेले आहेत.याच अनुषंगाने ◀◀ पान २ वर

### लग्नाचे आमिष: प्रियकराला अटक

जालनाः जालना शहरातील एका खाजगी बाल रुग्णालयात परिचारिका म्हणून काम करीत असलेल्या एका २४ तरुणीचे त्याच ठिकाणी कार्यरत असलेल्या अमोल जगन्नाथ तांगडे (रा. वझर सराटे, ता. जालना) याच्यासोबत प्रेमसंबंध जुळले होते. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून अमोल तांगडे याने त्या तरुणीवर रुग्णालयात, तसेच ती राहत असलेल्या लक्ष्मीनारायणपुरा भागातील खोलीत आणि स्वतःच्या खोलीमध्ये बोलावून अनेकवेळा शारीरिक संबंध ठेवलेले आहेत. सदर तरुणीने लग्नाचा तगादा लावला असता, तू माझ्या जातीची नाहीस, मागासवर्गीय आहेस, असे म्हणून त्याने तिच्यासोबत लग्नाला नकार दिला होता. त्यांनतर तो स्वतःचा मोबाईल बंद करून, जालना शहरातून गायब झाला होता. दरम्यान, सदर तरुणीने आपल्या आई-वडीलांसह ◀◀ पान २ वर

# परळी मतदारसंघातील १२२ संवेदनशील मतदान केंद्राबाबत दोन दिवसांत स्पष्टीकरण द्या

## राजेभाऊ फड यांच्या याचिकेवर उच्च न्यायालयाचे निवडणूक आयोगाला आदेश



**परळी । प्रतिनिधी**

२३३ परळी विधानसभा मतदारसंघात १२२ मतदान केंद्र हे अतिसंवेदनशील स्वरूपाचे आहेत. मागील लोकसभा निवडणुकीतून हे दिसून आलेले आहे. त्या मतदान केंद्रांवर गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास येऊन सुद्धा त्यावर प्रशासनाने कुठलीही उपाययोजना केलेली नाही. येत्या विधानसभा निवडणुकीत या सर्व मतदान केंद्रावर बोगस मतदान होण्याची आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे या सर्व संवेदनशील असलेल्या मतदान केंद्रावर सीसीटिव्ही यंत्रणा आणि सुरक्षा यंत्रणा पुरवली जावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली आहे. यावर निर्वाळा देत असताना न्या. एस. जी.चपळगावकर व न्या.विभा कंकणवाडी यांच्या न्यायालयाने म्हटले ◀◀ पान २ वर

# कृषिमंत्री धनंजय मुंडे उद्या भरणार उमेदवारी अर्ज

## आ.पंकजा मुंडे यांच्यासह स्थानिक पदाधिकारी राहणार उपस्थित



### कोणतेही शक्ती प्रदर्शन, रॅली किंवा सभेचे नसणार आयोजन!

**परळी वै. । प्रतिनिधी**

**राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे हे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी परळीतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महायुतीचे उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज गुरुवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ ते ३ या वेळेत साध्या पद्धतीने भरणार आहेत.**

उमेदवारी अर्ज सादर करताना भाजप नेत्या आमदार पंकजाताई मुंडे यांच्यासह परळी विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, शिवसेना व घटकपक्ष महायुतीचे प्रमुख पदाधिकारी यांची उपस्थिती असणार आहे. दरम्यान नेहमी रेकॉर्डब्रेक गर्दी व विक्रमी सभांचे आयोजन करणारे धनंजय मुंडे हे यावेळी साध्या पद्धतीने आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असून कोणतेही शक्ती प्रदर्शन रॅली किंवा सभेचे आयोजन करण्यात येणार नसल्याचे त्यांच्या कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे. २०१९ च्या ◀◀ पान २ वर

# आष्टी विधानसभेची जागा भाजपला सोडण्याबाबत पंकजा मुंडे आग्रही

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.सोमवारी रात्री पंकजा मुंडे यांनी अजित पवार यांची देवगिरी या त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी त्यांनी बीड जिल्ह्यातील जागा वाटपावर चर्चा करत आष्टी विधानसभा मतदार संघ हा भारतीय जनता पक्षाला सोडण्यात यावा यासाठी आग्रही भूमिका मांडल्याचे सूत्रांनी सांगितले.



सुरेश धस यांनी अजित पवारांसह पंकजा मुंडेची घेतली भेट

बीड जिल्हा हा भाजपाचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो.मात्र मध्यंतरी राज्यातील राजकीय उलथापालथ झाल्याने महायुतीच्या सरकार मध्ये राष्ट्रवादी अजित पवार गट सामील झाल्याने जागावाटपात बालेकिल्ला असलेल्या बीड जिल्ह्यातील भाजपला सामंजस्यातून किती जागा मिळतील यावर खलबत सुरू आहेत.मात्र आष्टी विधानसभेची जागा ही भाजपकडेच असावी यासाठी पंकजाताई मुंडे आग्रही असल्याचे या भेटी वरून दिसून येत आहे.त्यातच भाजपने पहिल्या ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ ऑक्टोबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ५५.०० क्विंटल | २,७०० | ३,४६० | २,८८२ |
| ज्वारी/हायब्रिडः१०१.०० क्विंटल | १,८०० | २,९७५ | २,२७७ |
| मका/लोकल :५.५० क्विंटल | २,४५० | २,४५० | २,४५० |
| तूर :७.५० क्विंटल | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : २७.५० क्विंटल | ५,२०० | ७,३५१ | ६,५५१ |
| बाजरीः ६८.०० क्विंटल | २,०६१ | २,७०० | २,३८८ |
| मुग : ५.०० क्विंटल | ६,७०० | ७,००० | ६,८१० |
| सोयाबीनः ७५८.०० क्विंटल | २,९४० | ४,२२१ | ३,९३४ |
| हरभराः ०.५० क्विंटल | ६,५५० | ६,५५० | ६,५५० |

# जरांगे पाटलांचे पुन्हा फर्मान; इच्छुकांनो चलो आंतरवाली

## उद्या बैठक; एका मतदार संघात एकच उमेदवारसाठी होणार चर्चा



**बीड। प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ६ मतदार संघांसह मराठवाड्यातील सर्व मतदार संघ आणि सांगली, कोल्हापुर, बुलढाणा, यवतमाळ, सोलापुर, अहमदनगर, नाशिक आणि अमरावती जिल्हयातील सर्वच मतदार संघातील सर्वच इच्छुकांसाठी ◀◀ पान २ वर

### शेख महेबुब, भाई थावरे जरांगेंच्या भेटीला




शरद पवार गटातील इच्छुक आष्टी मतदार संघातील शेख महेबुब आणि माजलगाव मतदार संघातील भाई गंगाभिषण थावरे यांनी मंगळवारी आंतरवली सराटीत जावून मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन उमेदवारीबाबत चर्चा केली आहे.

### तीन टप्प्यात करेक्ट कार्यक्रम

जरांगे पाटलांच्या नियोजनात तीन टप्पे आहेत. एक टप्पा-जिथे उमेदवार निवडून येतील आपण तिथेच उमेदवार देणार आहोत. दसरा टप्पा- एस.सी, एस.टी मतदार संघामध्ये जे आपल्या विचाराचे लोक आहेत, जे आपल्या मागणीशी सहमत आहेत, त्या मतदार संघातील मराठा समाजाची मतं त्यांना दिली जाणार आहेत, मग तो उमेदवार कोणत्याही पक्षाचा असो आणि त्याला निवडून आणले जाणार आहे. राखीव मतदार संघात दोन्ही आले नाही तर, त्या ठिकाणी अपक्ष उमेदवार दिला जाईल. त्याला निवडून आणत त्या दोघांना पाडणार आहोत. तीसरा टप्पा- ज्या ठिकाणी आमचा उमेदवार नाही अशा ठिकाणी आम्ही आधी त्या उमेदवाराकडून आमच्या मताशी सहमत असल्याचे लिहून घेणार आहोत, आणि मगच त्याला मराठा समाज मतदान करणार आहे, असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# ..तर अजित पवारांना घड्याळ चिन्ह वापरण्यास मुभा



## शरद पवार गटाच्या मागणीवरील सुनावणी तूर्त लांबणीवर

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

विधानसभा निवडणुकीसाठी अजित पवार गटाला घड्याळाऐवजी दुसरे चिन्ह देण्यात यावे, अशी मागणी शरद पवार गटाने केली होती. हे प्रकरण मंगळवारी (दि.२२) सर्वोच्च न्यायालयाच्या संभाव्य यादीत होते. मात्र मुख्य यादीत हे प्रकरण येऊ शकले नाही. त्यानंतर शरद पवार गटाच्या वतीने हे प्रकरण न्यायालयासमोर नमूद करण्यात आले आहे. मात्र विधानसभा निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, आमच्या काही उमेदवारांनी एबी फॉर्मसह अर्जही दाखल केले आहेत, असे म्हणत अजित पवार गटाच्या वतीने विरोध करण्यात आला आहे. या प्रकरणावर सुनावणीसाठी नवी तारीख दिली जाणार आहे. मात्र या क्षेत्रातील जाणकारांच्या माहितीनुसार यावर न्यायालय काही निर्णय देण्याची शक्यता ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# भाजपनेही गिरविला घराणेशाहीचा कित्ता...

सध्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने घराणेशाहीची सांगड घालावी लागेल. काँग्रेससह अन्य पक्षांवर घराणेशाहीचा आरोप करणाऱ्या भाजपने विधानसभेसाठी रविवारी जाहीर केलेल्या ९९ उमेदवारांच्या पहिल्या यादीवर घराणेशाहीचा पगडा दिसून येतो. दुसऱ्याच्या वाटातील कुसळ दिसणाऱ्या भाजपला स्वत:च्या ताटातील मुसळ दिसत नसेल हा भाग वेगळा. शिवाय ते साहजिक आहे. भाजपने पहिल्या यादीत ७१ विद्यमान आमदारांना वा मातब्बर राजकीय नेत्यांच्या नातेवाईकांना तिकिटे दिली आहेत. लोकसभा निवडणुकीत फटका बसल्याने भाजपने विधानसभा निवडणुकीत कोणताही थोका न पत्करता प्रभावशाली राजकीय घराण्यांना झुकते माप दिले आहे. दूध पोळले की माणूस ताकही फुंकून पितो असे म्हणतात, ते काही खोटे नाही.

मुंबईतील ३६ मतदारसंघांपैकी १४ जागांचे उमेदवार भाजपने जाहीर केले आहेत, पहिल्या यादीत पक्षाने १३ महिलांना तिकिटे दिली आहेत. या बादीत काही विद्यमान आमदारांचा पत्ता कट करण्यात आला आहे, तर काही नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेले काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांना भाजपने राज्यसभेवर पाठवले. त्यानंतर आता त्यांची कन्या श्रीच्या चव्हाण यांना भोकरमधून उमेदवारी दिली आहे. भाजपचे मुंबई अध्यक्ष व विद्यमान आमदार आशीष शेलार यांचे बंधू विनोद शेलार यांना मालाड पश्चिममधून, नारायण राणे यांचे पुत्र नितेश राणे यांना कणकवलीमधून, भाजपचे राज्यसभा खासदार धनंजय महाडिक यांचे बंधू अमल महाडिक यांना दक्षिण कोल्हापूरमधून उमेदवारी देण्यात आली आहे. रावसाहेब दानवे यांचे पुत्र संतोष दानवे यांना भोकरदनमधून तिकिट देण्यात आले आहे. माजी मुख्यमंत्री शिवानीराव पाटील निलंगेकर यांचे नातू संभाजी पाटील यांना निलंग्यामधून उमेदवारी मिळाली आहे. घाटकोपर पूर्व भाजपचा गड मानला जातो. प्रकाश मेहता यांनी यापूर्वी भाजपचा गड राखला, मात्र भाजप नेते पराग शहा आणि प्रकाश मेहता यांच्यात वाद असल्याने यावेळी भाजपने पहिली यादी जाहीर करताना घाटकोपर पूर्वची उमेदवारी जाहीर न करता वेट अँड वॉचची भूमिका घेतली आहे. कल्याण विधानसभा मतदारसंघातील भाजप आमदार गणपत गायकवाड सध्या गजाआड आहेत. त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांवर पोलिस ठाण्यात गोळीबार केला होता, गणपत गायकवाड यांची पत्नी सुलभा गायकवाड यांना भाजपने उमेदवारी दिली आहे, भाजपने आपल्या पहिल्या यादीत कोणताही नवा चेहरा न घेता बव्हंशी विद्यमान आमदारांनाच तिकिट दिले आहे. या यादीत १३ महिला, ४ अनुसूचित जाती आणि ६ अनुसूचित जमातीचे उमेदवार आहेत. भाजपने अशोक चव्हाण, रावसाहेब दानवे, बाळासाहेब फुंडकर आणि बबन पाचपुते परिवारावर विशेष मेहरबानी दाखवली आहे. फुंडकर यांचे पुत्र आकाश फुंडकर (खामगाव) आणि बबन पाचपुते यांची पत्नी प्रतिभा पाचपुते (श्रीगोंदा) यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शरद पवार यांना भेटून पक्ष सोडण्याची धमकी दिल्यानंतर गणेश नाईक यांना ऐरोली मतदारसंघाचे तिकिट देण्यात आले आहे. मंदा म्हात्रे यांचे तिकिट कापण्यात आले आहे. मात्र, बेलापूर मतदारसंघात त्यांच्या मुलाला तिकिट देण्यात आले आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना कामठी मतदारसंघात उमेदवारी देण्यात आली आहे. तेथे टेकचंद सावरकर यांचे तिकिट कापण्यात आले आहे. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना कुलाबा मतदारसंघात, कर्जत जामखेडमध्ये राम शिंदे तर कोथरूड मतदारसंघात चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यावरून घरोघरी मातीच्या चुली असतात. दुसऱ्यावर घराणेशाहीचा आरोप करणारे सुद्धा एकाच माळेचे मणी आहेत हे विसरून कसे चालेल. आपला तो बाब्या अन् दुसऱ्याचं ते कार्ट असे यालाच म्हणतात.

# वक्फ बैठकीत गदारोळ ; तृणमूल खासदार जखमी

दिल्ली । वृतसंस्था

**वक्फ दुरुस्ती विधेयकाबाबत संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) च्या बैठकीत गदारोळ झाला. यावेळी दोन खासदारांमध्ये जोरदार वादावादी झाली. तृणमूल काँग्रेसचे खासदार खासदार कल्याण बॅनर्जी यांनी रागाच्या भरता बाटली फोडली. यामुळे त्यांच्या बोटाला दुखापत झाली आहे.**



वक्फ विधेयकावरील (संयुक्त संसदीय समिती) ची बैठक संसदेच्या संलग्नीत सुरू झाली. घटनेच्या प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, टीएमसी खासदार कल्याण बॅनर्जी यांनी तिथे ठेवलेली काचेची पाण्याची बाटली उचलत ती टेबलावर आपटली. या घटनेत त्यांना स्वत:लाच दुखापत झाली आहे. दरम्यान, खासदार कल्याण बॅनर्जी यांना वक्फवरील संसदीय समितीमधून एका दिवसासाठी निलंबित करण्यात आले आहे. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी ८ ऑगस्ट रोजी २०२४ लोकसभेत वक्फ (सुधारणा) विधेयक, २०२४ आणि मुस्लिम वक्फ (रद्द) विधेयक, २०२४ सादर केले. ४० हून अधिक सुधारणांसह, वक्फ (सुधारणा) विधेयकात विद्यमान वक्फ कायद्यातील अनेक कलमे काढून टाकण्याचा प्रस्ताव आहे. हे विधेयक विद्यमान कायद्यात दूरगामी बदल सुचवते. त्याचबरोबर केंद्रीय आणि राज्य वक्फ बोर्डामध्ये मुस्लिम महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित करणे देखील समाविष्ट आहे. यासोबतच कोणत्याही धर्माचे लोक या समितीचे सदस्य होऊ शकतात. २०१३ मध्ये या कायद्यात शेवटची दुरुस्ती करण्यात आली होती.

### जेपीसीकडून होतेय तपासणी

काँग्रेस आणि समाजवादी पक्षासह विरोधी पक्षांनी या विधेयकाला मुस्लीमविरोधी म्हटले होते. विरोधकांच्या आक्षेप आणि प्रचंड विरोधादरम्यान हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे (जेपीसी) पाठवण्यात आले आहे. या जेपीसीमध्ये जगदंबिका पाल, निशिकांत दुबे, तेजस्वी सूर्या, अपराजिता सारंगी, संजय जयस्वाल, दिलीप सैकिया, अभिजीत गंगोपाध्याय, श्रीमती डीके अरोरा, गौरव गोगोई, इम्रान मसूद, मोहम्मद जावेद, मौलाना मोहिबुल्ला, कल्याण बॅनर्जी, ए. आर. राजा, एलएस देवरायुलु, दिनेश्वर कामत, अरविंत सावंत, सुरेश गोपीनाथ, नरेश म्हस्के, अरुण भारती आणि असदुद्दीन ओवेसी हे सदस्य आहेत.

# दिवाळी खरेदीत ऑनलाईन ऐवजी स्थानिकांना प्राधान्य द्यावे-पांचाळ

जालना । प्रतिनिधी

सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी सामाजिक दायित्वातून कार्यरत असलेल्या उडान ग्रुपने महिलांच्या उत्पादनांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी सुरू केलेली चळवळ ही उद्यमशील महिलांना बळ देणारी असून दिवाळीची खरेदी ऑनलाईन न करता स्थानिकांकडूनच करावी असे प्रतिपादन सौ. अश्विनी पांचाळ यांनी आज केले.

दिपावली, भाऊबीज सणांचे औचित्य साधून उडान ग्रुप तर्फे रुख्मिणी गार्डन येथे आयोजित दोन दिवसीय महाएक्स्पोचे उद्घाटन सोमवारी ( ता. २१) सौ.अश्विनी पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ग्रुपच्या संस्थापिका सौ. कीर्ती अग्रवाल , सारिका पिंपळे,नीता वझरकर,अर्चना शर्मा, मयुरी गौड,मानसी अग्रवाल,मीना सवाईवाला,अर्पिता मसाने,नंदिनी जार,अंजली शर्मा, जनकल्याण रक्तपेढीचे शिवराज जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविकात कीर्ती अग्रवाल यांनी सर्वसामान्य कुटुंबातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी स्थापन झालेल्या उडान ग्रुप ची वाटचाल, महिलांची प्रगती या बाबत माहिती दिली. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सारिका पिंपळे यांनी केले. महाएक्स्पोत एच. डी. एफ.सी.बँक आणि जनकल्याण रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबीरात अनेकांनी रक्तदान केले. प्रदर्शन स्थळी दिवाळी साठी पूजा सजावट साहित्य, रंगीबेरंगी तोरण,नक्षीकाम केलेले फॅशनेबल डिझाईनिंग ड्रेसेस, इंडो, वेस्टर्न, ज्वेलरी,आकर्षक दागिने, देवांची आभूषणे, वस्त्रे,नैसर्गिक सौंदर्य प्रसाधने , गॉगल्स, केसांची निगा राखण्यासाठी शाम्पू ,तेल,केक,चॉकलेटस, मसाले, पादत्राणे,विविध प्रकार चे चमचमीत खाद्य पदार्थांसह दैनंदिन गरजेच्या वस्तूंची साठ दालने थाटली असून पहिल्याच दिवशी महा एक्स्पोला जालनेकरांनी उदंड प्रतिसाद दिला. दरम्यान मंगळवारी ( ता. २२)सकाळी १०.००ते रात्री १०.०० या वेळेत सुरू राहणार असून जालनेकारांनी खरेदीचा लाभ घ्यावा असे आवाहन ग्रुपच्या संस्थापिका सौ कीर्ती अग्रवाल यांच्यासह उडान ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे.




## विभागीय आयुक्त गावडे यांनी घेतला निवडणूक पूर्वतयारीचा आढावा

जालना । प्रतिनिधी

**विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करीताचे जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदारसंघात २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. याअनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रत्येक नियमांचे व सूचनांचे जिल्हा निवडणूक अधिकारी तसेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काटेकोर पालन करुन ही निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, नि:ष्पक्ष वातावरणात पार पडण्यासाठी योग्य नियोजन करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी आज दिल्या.**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या पूर्वतयारीच्या आढावा बैठकीत विभागीय आयुक्त श्री. गावडे बोलत होते. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना, पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल, विभागीय उपायुक्त जगदीश मिणियार, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशीकांत हदगल, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, सर्व जिल्हा निवडणूक निर्णय अधकिारी, सर्व नोडल अधिकारी यांची यावेळी उपस्थिती होती. श्री. गावडे की, लोकशाहीच्या सक्षमीकरणासाठी प्रत्येक मतदाराचे मतदान महत्त्वपूर्ण व निर्णायक आहे. प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजाविल्याशिवाय लोकशाहीला पूर्णत्व नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने राज्यघटनेने दिलेल्या मतदान करण्याच्या अधिकाराचा वापर करावा. पुढे बोलतांना ते म्हणाले की, मतदार जनजागृती व साक्षरतेसाठी स्वीप मोहिमे अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात यावे. युवा मतदारांना मतदानाच्या राष्ट्रीय उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहीत करावे. जिल्ह्यातील ज्येष्ठ व दिव्यांग मतदारांचे गृहमतदान अधिक प्रमाणात होण्यासाठी प्रयत्न करावे. आदर्श आचारसंहितेचे उमेदवारांकडून काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करावी.

# खासगी दूरचित्रवाणी वाहिनी आणि एफ.एम.रेडिओ यांच्या तक्रार प्राप्त झाल्यास कारवाई होणार-श्रीमती मैत्रवार

जालना । प्रतिनिधी

**केबल टेलिव्हीजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ अंतर्गत दूरचित्रवाणी, स्थानिक वाहिन्या, खासगी एफ.एम. रेडिओ केंद्र आणि कम्युनिटी रेडिओवरून प्रसिद्ध होणाऱ्या आक्षेपार्ह प्रसारणावर या समितीचे नियंत्रण राहणार असून, त्यासंदर्भात अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रवार यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय समितीची बैठक पार पडली.**



यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, . प्रभाकर गवारे, प्रा. श्रीमती सुजाता काशिनाथराव देवरे (अग्निहोत्री) दूरदर्शन प्रतिनिधी श्री. अनंत साळी आणि समिती सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी अरुण सुर्यवंशी यांची बैठकीला उपस्थिती होती. सर्व खासगी वाहिन्यांनी केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ चे पालन करणे बंधनकारक असून, कायद्यानुसार सर्व नोंदणीकृत खाजगी वाहिन्यांनी फ्रि-टू-एअर वाहिन्या आणि दूरदर्शन वाहिन्याचे प्रक्षेपण करणे बंधनकारक आहे. जाहिरात संहितेचे कार्यक्रमाच्या प्रसारणात उल्लंघन करणे, विविध धर्म, जाती, भाषा, वर्ग, समूह आणि समाजाच्या भावना दुखविणारे किंवा समाजात द्वेषभावना पसरविणारे प्रसारण करणाऱ्यांविरुद्ध चौकशी करून कारवाई करण्याचे व अशा प्रसारणाची तक्रार आल्यास संबंधित केबल चालकाकडून कार्यक्रमाची दृश्ये मागविण्याचे अधिकार समितीला आहेत. ज्या नोंदणीकृत खाजगी वाहिन्या किंवा एफ.एम. रेडिओ केंद्र किंवा कम्युनिटी रेडिओ केंद्रावरुन आक्षेपार्ह प्रक्षेपण करत असतील अशा वाहिन्यांची किंवा रेडिओची तक्रार प्राप्त झाल्यास या कायद्यानुसार संबंधितावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच अनिवार्य वाहिन्यांच्या प्रक्षेपणात व्यत्यय येणे, सिग्नल न मिळणे अशा त्रुटी आढळल्यास किंवा तक्रारी प्राप्त झाल्यास प्राधिकृत अधिकाऱ्यांनी संबंधित केबल ऑपरेटरला समज देण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी श्रीमती. मैत्रवार यांनी दिल्या. जिल्ह्यातील कार्यरत खासगी एफ. एम. रेडिओ आणि कम्युनिटी रेडिओ स्टेशन्सद्वारे हवाई प्रसारण संहितेचे पालन होते का नाही यावर लक्ष व नियंत्रण ठेवणे, तक्रारींची शहानिशा करून केवल चालक किंवा खासगी एफ.एम. रेडिओ विरुद्ध तात्काळ योग्य ती कारवाई समितीमार्फत करण्यात येणार आहे. एखाद्या कार्यक्रमाचा सार्वजनिक सुव्यवस्थेवर परिणाम होत असेल किंवा कोणत्याही समाजात असंतोष निर्माण होत असेल तर तात्काळ जिल्हाधिकारी तसेच राज्य व केंद्र शासनाच्या त्वरित नजरेस आणून द्यावेत, असे आदेश अपर जिल्हाधिकारी श्रीमती. मैत्रवार यांनी दिले. तसेच खाजगी दूरचित्रवाणी वाहिनी किंवा एफ.एम. रेडिओ केंद्र किंवा कम्युनिटी रेडिओ केंद्रावरुन आक्षेपार्ह संदेशाचे प्रसारण होत असल्यास संबधित वाहिन्यावर कार्यवाही करण्यासाठी जिल्ह्यातील शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थी व नागरिकांमध्ये सदर केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ कायद्याबाबत विविध माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याच्या सूचना अपर जिल्हाधिकारी श्रीमती. मैत्रवार यांनी यावेळी दिल्या. जिल्ह्यातील स्थानिक केबल ऑपरेटरमार्फत प्रसारित होत असलेल्या स्थानिक व सॅटेलाईट वाहिन्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित केबल ऑपरेटर यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील कार्यालय अथवा सक्षम प्राधिकारी यांना किमान पाच केबल जोडण्या मोफत देणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर वाहिन्यावरुन प्रसारित होणाऱ्या आक्षेपार्ह कार्यक्रम व जाहिरातीवर नियंत्रण ठेवणे शक्य होईल, असेही त्यांनी सांगितले. या बैठकीत आक्षेपार्ह कार्यक्रम व जाहिरातीबाबत एकही प्रकरण दाखल झाले नसल्याचे सांगून खासगी दूरचित्रवाणी वाहिन्या आणि एफ.एम. रेडिओ केंद्रे तसेच कम्युनिटी रेडिओ केंद्रावरून होणाऱ्या प्रसारित होणाऱ्या सामुग्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम १९९५ चा उद्देश आणि कार्यक्षेत्र याची सदस्य सचिव तथा जिल्हा माहिती अधिकारी अरुण सूर्यवंशी यांनी माहिती दिली. यासाठी जिल्हा माहिती कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असून जिल्ह्यातील स्थानिक वाहिन्यांबाबत जिल्ह्यातील नागरिकांच्या तक्रारी असतील, तर त्या त्यांनी जिल्हा माहिती कार्यालय, तळ मजला, प्रशासकीय इमारत, जालना येथे सादर कराव्यात. तसेच प्राप्त तक्रारी समितीसमोर ठेवण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती देत जिल्हा माहिती अधिकारी तथा सदस्य सचिव अरुण सूर्यवंशी यांनी आभार मानले. सद्यस्थितीत विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीची आचारसंहिता लागू झाली असून, या कालावधीत स्थानिक केबल वाहिन्यावरुन राजकीय जाहिरात प्रसारीत होण्याची शक्यता आहे. याकरिता जिल्ह्यातील केबल ऑपरेटर यांच्याकडून स्थानिक वाहिन्यांवर प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांची आणि केबल जोडण्यांची माहिती घ्यावी. तसेच प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांवर सनियंत्रण ठेवण्याचे निर्देश अपर जिल्हाधिकारी श्रीमती. मैत्रवार यांनी यावेळी दिले.

## पान १ वरून...

### कापसाच्या नुकसानीकडे विमा

आहेत. यंदा पावसाची स्थिती सुरुवातीपासून चांगली असल्याने लवकर लागवड झाली. त्यामुळे आता कापूस वेचणीला आला आहे. मागील आठ दिवसांत अनेक भागांत अचानक पाऊस झाला. त्या पावसाने बोंडातून फुटलेला कापूस काळा पडला आहे. नुकसान झालेल्या परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी नुकसानीबाबत विमा कंपनीला तसेच कृषी विभागाला कळवले आहे. मात्र विमा कंपनी आणि कृषी विभागाकडून पावसाने झालेल्या कापूस व अन्य पिकांच्या नुकसानीकडे डोळेझाक केल्याचे दिसून येत आहे. नुकसान झाल्याबाबत कळवल्यावर तातडीने स्थळ पाहणी, पंचनामे करणे गरजेचे असताना नुकसान झाल्याचे आठ दिवस झाले तरी अजूनही कोणी शेतात फिरकले नसल्याचे चित्र मराठवाड्यात दिसत आहे. दरम्यान, झालेल्या नुकसानीने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

-----------

### नर्मदा सॉलवेंट एक्स्ट्राक्शन

माजलगाव तालुक्यातील रामेश्वर ज्योतिबा उदमले यांनी नर्मदा सॉलवेंट एक्स्ट्रक्शन एलएलपी या कंपनीने केनरा बँकेच्या छत्रपती संभाजीनगर येथील अधिकाऱ्यांशी संगणमत करत बारा लाख रुपये बाजार मूल्य असलेल्या एका प्लॉटवर तब्बल ४० कोटी रुपयांचे कर्ज उचलत गैरव्यवहार केल्याप्रकरणी तक्रार दाखल केलेली आहे.सदरील प्रकरणात तक्रारदाराने बारा लाख रुपये बाजार मूल्य असलेल्या प्लॉट प्रॉपर्टी व्यतिरिक्त इतर काही प्रॉपर्टी केनरा बँकेकडे गहाणखत घेतली असल्याची माहिती मागितली असता बँकेकडून इतर कुठल्या प्रकारचे गहाणखत किंवा मॉडगेज काही प्रकार ठेवण्यात आल्याबाबत तक्रारदाराच्या तक्रारीचे उत्तर देऊन समाधान केलेले नसल्याने तक्रारदाराने केंद्रीय अन्वेषण विभाग मुंबईकडे तक्रार दाखल करत बारा लाख रुपये बाजार मूल्य असलेल्या एका प्लॉटवर कॅश क्रेडिट स्वरूपाचे १८ कोटी तर मध्यम मुदत स्वरूपाचे २१ कोटी ७० लाख रुपये कर्ज कशाप्रकारे वितरित केले याची माहिती विचारत योग्य त्या कागदपत्रांची जुळवाजुळव करून तक्रार दाखल केली आहे. केंद्रीय अन्वेषण विभाग मुंबईकडून तक्रारदार रामेश्वर उदमले यांच्या तक्रारीवरून नेमकी काय आणि कोणती कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणी नर्मदा सॉलवेंट एक्स्ट्राक्शन एलएलपीचे संचालक मंडळ गोत्यात येऊ शकत.

--------

### सत्ता परिवर्तनाची चाहूल

फॅक्टर, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसची फोडाफोडी, सीबीआय, ईडी यामुळे जनतेच्या मनात महायुतीच्या बाबतीत राग आहे, संताप आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या विरोधात जनमत जाईल, अशी शक्यता वर्तवली जात असून त्यामुळेच की काय महायुतीच्या बड्या नेत्यांनी सध्या एकामागून एक महाविकास आघाडीत प्रवेश करण्याचा सपाटा लावला आहे. बीड जिल्ह्यातही हे सत्र सुरु झाले असून महायुतीचा घटक पक्ष असलेल्या शिवसंग्रामच्या नेत्या डॉ. ज्योतीताई मेटे यांनी मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यावर शरद पवार यांच्या पक्षात प्रवेश केला. त्यानंतर भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी सुध्दा तुतारी हाती घेतली असून महायुतीचे बरेच नेते वेटींगवर असल्याचे समजते. यात गेवराईचे आ. लक्ष्मण पवार, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, माजलगावचे भाजप नेते रमेश आडसकर, मोहन जगताप यांचा समावेश आहे. येणाऱ्या काळा ही सर्व नेते मंडळी जनमताचा कौल आणि सत्ता परिवर्तनाची चाहूल लागल्याने महाविकास आघाडीकडे उड्या मारतील, असे म्हटले जात आहे.

------------

### कृषिमंत्री धनंजय मुंडे गुरूवार दि.२४

निवडणुकीमध्ये निवडून आल्यानंतर धनंजय मुंडे यांनी मागील पाच वर्षाच्या काळात सामाजिक न्याय व कृषी या दोन खात्यांचे बारी बारीने मंत्री पद सांभाळले. या काळात परळी विधानसभा मतदारसंघासह बीड जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक भरीव कामे करत धनंजय मुंडे यांनी पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर दिला. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून कोविड महामारीच्या काळात धनंजय मुंडे यांनी परळीसह जिल्ह्यात केलेले सूक्ष्म नियोजन अत्यंत प्रभावी ठरले, त्याची दखल अगदी आंतरराष्ट्रीय माध्यमांनी सुद्धा घेतली. परळी मतदारसंघात देखील या काळात मुंडेंच्या माध्यमातून अनेक विकासकामे पूर्ण करण्यात आली, तर अनेक कामे प्रगतीपथावर आहेत, त्याचा फायदा या निवडणुकीत धनंजय मुंडे यांना निश्चितच होईल.

-----------

### परळी मतदारसंघातील १२२ संवेदनशील

आहे की, निवडणूक आयोगाने याबाबत येत्या दोन दिवसांत त्यांचे स्पष्टीकरण आणि शपथपत्र सादर करावे व त्यावर काय उपाययोजना केल्या याबाबत कोर्टाला अवगत करावे असे आदेश दिले आहेत. परळी विधानसभा निवडणूक ही लोकशाही पद्धतीने आणि निर्भय वातावरणात पार पडावी, तसेच अनुचित प्रकार घडू नयेत अथवा बोगस मतदान होऊ नये यासाठी निवडणूक आयोगाने योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. मात्र याबाबत प्रशासनाकडून कुठलीही उपाययोजना होतांना दिसत नाही. याच कारणास्तव राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवा नेते राजेभाऊ फड यांनी उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ११८७७ दाखल केली आहे. यावर न्यायालयाने निवडणूक आयोगाला येत्या दोन दिवसांत स्पष्टीकरण आणि शपथपत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. प्रशासनाचा हलगर्जीपणा आणि राजकीय दबावाखाली काम करणाऱ्या प्रशासकीय यंत्रणेला चपराक बसली आहे. मतदारसंघातील १२२ बूथ बद्दल योग्य ती उपाययोजना करून लोकशाही पद्धतीने आणि निर्भय वातावरणात निवडणूक घ्या असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

--------------

### लग्नाचे आमिष:

सोमवारी रात्री कदीम जालना पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी आरोपी अमोल तांगडे याच्याविरुद्ध बलात्कार आणि ॲट्रॉसीटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून, त्यास अटक करण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी करीत आहेत. पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, उपनिरीक्षक ज्ञानदेव नागरे यांच्यासह पिंक मोबाईल पथकाचे कर्मचारी तपासात मदत करीत आहेत.

-----------

### जरांगे पाटलांचे पुन्हा फर्मान;

मनोज जरांगे यांनी पुन्हा फर्मान काढले आहे. आता एका मतदार संघात एकच उमेदवार देण्यासाठी जरांगे पाटलांनी मिशन हाती घेतले असून दि. २४ ऑक्टोबर रोजी चलो आंतरवली सराटी असा इच्छुकांसाठी नारा देण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी विधान सभा निवडणुकीत कोणाला पाडायचे आणि कोणाला निवडून आणायचे हे ठरवले आहे. ज्या मतदार संघात जरांगे पाटलांकडे सक्षम उमेदवार नाही, त्या ठिकाणी पाठींबा देऊन समोरचा उमेदवार पाडायचा तर ज्या ठिकाणी तगडा उमेदवार आहे, त्याला उभे करुन निवडूण आणायचे असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी जरांगे पाटलांनी सर्वच मतदार संघातील इच्छुकांना बैठका घेऊन एकच उमेदवार निवड करण्याबाबत सांगितले होते. मात्र याबाबत कोणत्याच मतदार संघात सहमती झालेली नसल्याने जरांगे पाटील यांनी दि. २४ ऑक्टोबर रोजी आंतरवली सराटी येथे इच्छुकांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत ज्या त्या मतदार संघातील इच्छुकांबरोबर चर्चा करुन एका मतदार संघात एकच उमेदवार ठरवण्यात येणार असल्याचे समजते.

-----------

### आष्टी विधानसभेची जागा भाजपला

यादीत केजमधून आ.नमिता मुंदडा यांचे नाव निच्छीत केल्याने आता आष्टी विधानसभेची जागा कुणाला मिळणार आणि यामध्ये उमेदवार म्हणून कुणाला संधी मिळणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. जागा वाटपावरून महायुतीतून मोठ्या प्रमाणावर खलबते सुरू असताना आष्टी मतदार संघातून सुरेश धस यांनी निवडणूक लढवावी यासाठी कार्यकर्ते आग्रही असल्याचे दिसत असून.धस यांनी देखील याबाबत मंगळवारी मुंबई येथे पंकजा मुंडे यांची सदिच्छा भेट घेत विधानसभा निवडणुकीबाबत सविस्तर चर्चा केल्याचे समजते.

------------

### ..तर अजित पवारांना घड्याळ

कमी आहे. त्यामुळे तूर्त अजित पवार गटाला हा मोठा दिलासा मानला जातो आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह कोणाचे यासंदर्भातली एक याचिका सर्वोच्च न्यायालयात आहे. याच याचिकेमध्ये शरद पवार गटाचे वकील डॉ. अभिषेक मनु सिंघवी यांनी एक अर्ज दाखल केला होता. यामध्ये त्यांनी अजित पवार यांना देण्यात आलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे घड्याळ चिन्हाऐवजी नवे चिन्ह देण्यात यावे, अशी मागणी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाव आणि चिन्ह प्रकरणावर सुनावणी करत असेलेले न्यायमूर्ती सूर्यकांत आणि उज्वल भुयान यांच्यासमोर हे प्रकरण नमुद करण्यात आले होते. त्यानंतर न्यायालयाने अजित पवार गटाला नोटीसही बजावत उत्तरे सादर करण्यास सांगितले होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्हाचा निकाल निवडणूक आयोगाने फेब्रुवारी २०२४ मध्ये दिला होता. या निकालानुसार अजित पवार गटाला मूळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मानून त्यांना पक्षाचे नाव आणि चिन्ह देण्यात आले. त्यानंतर या निकालाविरुद्ध शरद पवार गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयाला स्थगिती दिली नाही. मात्र हे सांगितले की आम्ही निर्णय देईपर्यंत अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हे नाव आणि घड्याळ चिन्ह वापरू शकेल. दरम्यान, शरद पवार गट नव्या चिन्हासाठी आणि नावासाठी निवडणूक आयोगाकडे अर्ज करू शकतो. त्यानुसार शरद पवार गटाने निवडणूक आयोगाकडे अर्ज केला. निवडणूक आयोगाने त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार हे नाव आणि तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह देण्यात आले. पुढे लोकसभा निवडणुकीदरम्यान अजित पवार गट घड्याळ चिन्ह वापरत असताना त्याखाली हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असे लिहिण्यासही सर्वोच्च न्यायालयाने सांगितले होते. आता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि चिन्ह या मुख्य प्रकरणाच्या सुनावणीसाठी १२ नोव्हेंबर ही तारीख देण्यात आली आहे.

cmyk

## बीडची जागा शिवसेनेचीच, मुख्यमंत्री शिंदे बाळासाहेबांच्या एकनिष्ठ शिवसैनिकावर अन्याय करणार नाहीत- सुनिल अनभुले



बीड (प्रतिनिधी) शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. एकदा नव्हे तब्बल तीन वेळा शिवसेनेचा आमदार बीडकरांनी निवडुन दिला आहे. वर्षानुवर्षे बीड मतदार संघाची जागा शिवसेनेला सुटत आली आहे आणि ती यावेळेसही शिवसेनेलाच सुटणार आहे. तीन दशकांपेक्षा अधिक काळ मा. अनिलदादा जगताप हे बाळासाहेबांच्या विचारधारनेला प्रेरित होऊन संपूर्ण जिल्ह्याभरात शिवसेना पक्ष बांधणी करत आले आहेत. बीडला शिवसेनेचा बालेकिल्ला बनविण्यात अनिलदादांचे योगदान मोलाचे आहे आणि हे बीडकर देखील चांगलेच जाणून आहेत. आजवर शिवसेना आणि बाळासाहेब यांच्या विचार व धोरनावर ठाम राहणाऱ्या अनिलदादा जगताप यांच्या कार्याचे आणि योगदानाची सर्वोपरी माहिती तळागाळातील माणसांची जाण असणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथजी शिंदे साहेब यांना आहे. यामुळे मुख्यमंत्री शिंदे साहेब हे बाळासाहेबांचे निष्ठावंत शिवसैनिक असणाऱ्या मा. अनिलदादा जगताप यांच्यावर अन्याय होऊ न देता अनिलदादांना न्याय देणार असा आम्हा शिवसैनिकांना पूर्णतः विश्वास असल्याचे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी माध्यमांना पत्रक प्रसिद्ध करून आपले मत व्यक्त केले आहे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांनी बीडची जागा शिवसेनेलाच सुटणार आहे व त्यासाठी कामाला लागा असे सांगितले देखील आहे आणि आम्ही देखील सर्व शिवसैनिक अनिलदादा जगताप यांना विक्रमी मतांनी निवडून आणण्यासाठी कामाला लागलो आहोत. अनिलदादा जगताप यांचा यंदाच्या विधानसभा निवडणुकीत विजय पक्का आहे व ते विक्रमी मतांनी निवडून येणार यात तिळमात्र शंका नाही असे बीड विधानसभा प्रमुख सुनिल अनभुले यांनी पत्रकात म्हंटले आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार दि.२३ ऑक्टोबर २०२४




# कामचुकार अधिकाऱ्यांची खरडपट्टी होणार

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात सर्व खाते प्रमुखांची आज बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आज दिनांक २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी बैठक घेणार असून या बैठकीला पीपीटी सह सर्व खाते प्रमुखांनी स्वतः हजर राहावे .प्रतिनिधींना पाठवू नये असे आदेश काढले आहेत. त्यामुळे आता या बैठकीला खाते प्रमुखांना हजर रहावे लागणार आहे .**

बीड जिल्हा परिषदेचा कारभार मध्यंतरीच्या काळात फारच ढेपाळला होता. कोणाला कोणाचा पायपोस नव्हता आता बीड जिल्हा परिषदेला सक्षम मुख्य कार्यकारी अधिकारी मिळाले असून त्यांनी आता प्रत्येक विभागात काय चालले आहे ? याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे .या सर्व विभागाचा एकत्रित आढावा घेतला जाणार असून पाणीपुरवठा योजना किती कार्यान्वित झाल्या स्वच्छ भारत मिशनचे काय चालु आहे? आरोग्य विभागात काय चालले आहे? पंचायत विभागात काय चालू आहे ? प्रकल्प संचालकाच्या कार्यालयात कुठली कामे चालू आहेत? वित्त विभागातून किती बिले गेले किती कामे पुर्ण झाली ?बांधकाम विभागाचे किती काम पूर्ण झाले ? आणखी किती काम बाकी आहे? या सर्व बाबींचा आढावा आज मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने घेणार आहेत. यापूर्वी बैठकीला कुठल्यातरी एका कर्मचाऱ्याला पाठवायचे आणि बैठकीपासून आपण



काढता पाय घ्यायचा असा प्रकार अनेक उपमुख्य कार्यकारी अधिकारी करायचे. मात्र आता स्पष्टपणे आदेश काढून स्वतः खाते प्रमुखांनी उपस्थित रहावे प्रतिनिधींना पाठवू नये असे आदेशित केल्याने अनेकांना आता उत्तरे द्यावी लागणार आहेत. आपल्या कामाचा रिझल्ट द्यावा लागणार आहे. सर्वात चर्चिला जाणारा विषय म्हणजे पाणीपुरवठा विभागाचा आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतच्या अखत्यारीत पाणीपुरवठा योजनेच्या अनेक योजना चालू आहेत. यात मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात १५ टक्केही काम झालेले नाही .जवळपास १०० गावचे काम पूर्ण झाल्याचे सांगण्यात येत असले तरी हे काम एकूण कामाच्या दहा टक्केही नाही .त्यामुळे ही योजना कशी पूर्ण होणार? हा मोठाच प्रश्न आहे कामाच्या तुलनेत निधी मात्र मोठ्या प्रमाणात देण्यात आलेला असून येत्या महिन्याभरात किमान ५० टक्के काम व्हावे अशी नोटीस दोन दिवसांपूर्वीच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी काकडे यांनी काढली आहे. आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बैठकीला किती खाते प्रमुख उपस्थित राहतात .हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## विधानसभा मतदार संघासाठी २ उमेदवारांचे ३ अर्ज दाखल, १५८ उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण

**जालना । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील ९९- परतूर, १००- घनसावंगी, १०१-जालना, १०२- बदनापूर (अ.जा.) आणि १०३-भोकरदन या पाच विधानसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज २ उमेदवारांनी ३ नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहेत. आजपर्यंत एकुण २ उमेदवारांचे ३ नामनिर्देशन अर्ज स्विकारण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे. ९९-परतूर, १०२-बदनापूर आणि १०३-भोकरदन या तीन विधानसभा मतदार संघासाठी आज कोणीही अर्ज दाखल केला नाही. मंगळवार दि. २२ ऑक्टोबर, २०२४ रोजी १००-घनसावंगी मतदारसंघासाठी चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) यांनी दोन तर १०१-जालना विधानसभा मतदारसंघासाठी मिलिंद बालु बोर्डे (अपक्ष) यांनी एक नामनिर्देशन अर्ज दाखल केले आहे. याप्रमाणे चोथे शिवाजीराव कुंडलिकराव (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे) आणि मिलिंद बालू बोर्डे (अपक्ष) याप्रमाणे आज दोन नामनिर्देशन अर्ज दाखल केले असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

आजच एकूण १५८ इच्छुक उमेदवारांना ४०३ नामनिर्देशन अर्जाचे वितरण करण्यात आले आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेतले. उमेदवारांना मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते ३ यावेळेत आपले नामनिर्देशन पत्र सादर करता येणार आहे. बुधवार, दि. ३० ऑक्टोबर, २०२४ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येणार असून, सोमवार, दि. ४ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत उमेदवारांना आपले अर्ज मागे घेता येणार आहे. तर बुधवार, दि. २० नोव्हेंबर, २०२४ रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मतदान होणार आहे. या निवडणूकीचा निकाल शनिवार दि. २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी जाहिर केला जाणार आहे.

# आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवा जीवनात काहीच कमी पडणार नाही

## डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे प्रतिपादन; नागापूर (खु.) येथे स्पर्धा परीक्षेचे बक्षीस वितरण

**बीड । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात शिक्षणाकडे लक्ष द्यावे. शालेय शिक्षणच स्पर्धा परीक्षेचा पाया आहे. आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवा, जीवनात तुम्हाला काहीही कमी पडणार नाही, असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केले.

बीड तालुक्यातील नागापूर (खुर्द) येथे श्री.संत सावता गणेश मंडळातर्फे आयोजित विविध स्पर्धा परीक्षांचे सोमवारी (दि.२१) बक्षीस वितरण पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ.दिपाताई



क्षीरसागर ह्या बोलत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून वाहेगाव येथील श्रीहरी विद्यालयाचे मुख्याध्यापक के.डी.राऊत, मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. हनुमान लव्हाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश साळुंके, मा.सरपंच अर्जुन साळुंके, साळुंके, किशोर ठोकणे, पत्रकार चंद्रकांत साळुंके, चेअरमन लक्ष्मण साळुंखे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी हनुमान साळुंके, धर्मा साळुंके, महेंद्र साळुंके, समाधान घोडके, परमेश्वर साळुंके, गोकुळ साळुंके यांनी मेहनत घेतली. शाम साळुंके यांच्या सुत्रसंचलनाने कार्यक्रमाची शोभा वाढवली. प्रास्ताविक नामदेव साळुंके केले. आभार प्रा.रखमा साळुंके यांनी मानले. यावेळी लहान मुलांमध्ये कमालीचा आनंद उत्साह दिसून आला. दरम्यान, गावातील ज्येष्ठ पोलीस पाटील हसन पठाण यांची डॉ.दिपाताईंनी भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली.

# भाई गंगाभिषण थावरे यांनी घेतली मनोज जरांगे यांची भेट

माजलगाव । प्रतिनिधी

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी उमेदवार उभे करण्याची घोषणा केल्यानंतर अनेक इच्छुकांनी त्यांची भेट घेतली आहे. शेतकरी नेते गंगाभिषण थावरे यांनी आज अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे यांची भेट घेतली. माजलगाव विधानसभा मतदारसंघातून थावरे यांनी उमेदवारी मागितली आहे.

शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी आपले आयुष्य वंचित, कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी वाहिले आहे. या सर्व घटकांच्या प्रश्नासाठी भाई थावरे गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन, मोर्चे काढून शासन दरबारी मागण्या मांडून त्यांची सोडवणूक करत आहेत. यामुळे माजलगाव मतदारसंघात तळागाळातील कार्यकर्ता म्हणून




थावरे यांची ओळख निर्माण झाली असून त्यांना मानानारा मोठा वर्ग या मतदारसंघात आहे. थावरे यांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम केले आहे. गेल्या विधानसभा निवडणुकीत थावरे यांना मोठ्या प्रमाणात मते मिळाली होती. शेतकऱ्यांचा नेता म्हणून मतदारसंघात ओळख असलेल्या भाई गंगाभिषण थावरे यांनी आज अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी मागितली आहे. दरम्यान जरांगे पाटील यांनी त्यांना २४ ऑक्टोबर रोजी मुलाखतीसाठी बोलावले आहे.

# आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करावी

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाकडून राज्यात विधानसभा निवडणूकीचा कार्यकम दि.१५ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित झाला असून निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. तरी १०० घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणावरील विविध बाबीचे विरुपण करुन आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करावी. अशी सुचना तहसीलदार तथा १००-घनसावंगी विधानसभा मतदार संघाचे सहा.निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केली आहे.

निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानूसार सर्व ठिकाणची वाहने, भिंती, नामफलक उदघाटन शिला किंवा राजकीय प्रचार, भिंतीपत्रक, बॅनर्स, फ्लेक्स, कट आऊटस, डिजीटल आदि काढण्याची कार्यवाही आदर्श आचारसंहिता लागु झाल्यापासून पहिल्या २४ तासात, ४८ तासात आणि ७२ तासात करणे अनिवार्य आहे. तरी निवडणूक आयोगाच्या निर्देशानूसार संबंधित अधिकारी, विभाग, संबंधित यंत्रणेला आदेशित करावे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# गुटखा बाळगणाऱ्या विरुध्द दोन ठिकाणी छापेमारी दोन लाखांचा गुटखा जप्त, स्थागुशाची कामगिरी

बीड । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षकांच्या आदेशावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी बीड शहरामध्ये अवैधरित्या गुटखा बाळगणाऱ्या इसमाची माहिती काढून त्यांच्यावर छापे मारून जवळपास दोन लाखाचा गुटखा जप्त केला. यामध्ये गुटखा बाळगणाऱ्या आरोपींनाही स्थागुशाच्यापोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलीस निरीक्षक उस्मान शेख, स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले आहे. त्याअनुषंगाने पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था.गु.शा.बीड यांना आपले अधिपत्याखालील अधिकारी व अंमलदार यांना प्रतिबंधीत पानमसाला गुटक्या बाळणारे इसमाची माहिती काढुन कारवाई करण्याचे आदेश दिले. दिनांक २२/१०/२०२४ रोजी पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे यांचे पथकाने शिवाजीनगर,बीड हद्दीतील गुप्त बातमीदारा मार्फत मिळालेल्या माहिती नुसार शिंदेनगर कॅनॉल रोड येथे इसम नामे प्रितम निवृत्ती मोहळकर, रा.शिंदे नगर यांचे हा प्रतिबंधीत गुटख्याचा मुद्देमाल एकुण ५७५००/- रु चा मुद्देमाल हस्तगत करुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे पोह/मनोज वाघ यांचे फिर्याद वरुन गुन्हा



नोंद केला आहे. तसेच ग्रेट पोउपनि हनुमान खेडकर यांचे पथकाने बीड शहरातील हत्तीखाना येथील फशी किराणा दुकानात अवैधरित्या गुटखा बाळगुन ठेवण्याची माहिती मिळताच स्थागुशा पथकाने सदर किरणा दुकानावर छापा टाकुन प्रतिबंधीत पानमसाला गुटख्याचा १,३३७६०/- रु चा मुद्देमाल साठा करुन ठेवलेला मिळुन आला असुन आरोपी मोमीन फासीयोद्दीन मोमीन फाजलोद्दीन रा. हत्तीखाना बीड यांचे विरुध्द पो.स्टे.बीड शहर येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखा,बीड ने दोन ठिकाणी अवैध गुटखा बाळगणारे आरोपी विरुध्द छापेमारी करुन कारवाई केलेली असुन एकुण १९१२६०/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा.श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधिक्षक, श्री. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक,बीड, पोलीस निरिक्षक श्री.उस्मान शेख, स्थानिक गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे, श्रेणी पोउपनि खेडकर, सफौ/तुळशिराम जगताप, पोह/५६८ ठोंबरे, मनोज वाघ, पोह/देविदास जमदाडे, राहुल शिंदे, विकास वाघमारे, राजु पठाण, महेश जोगदंड, तुषार गायकवाड, बप्पासाहेब घोडके, चालक गणेश मराडे, सुनिल राठोड यांनी केली आहे.

# साखर कारखानदारीत केले, आता राजकारणात परिवर्तन करणार- सतीश घाटगे

## ‘समृद्धी’च्या भूमिपूजन सोहळ्यात घाटगे पाटलांचा निवडणूक लढण्याचा निर्धार

**अंबड । प्रतिनिधी**

समृद्धी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण झाल्यास शेतकऱ्यांचा उस बांधावर पडू नये, त्यांच्या उसाला न्याय आणि चांगला भाव मिळावा, म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. मंगळवारी (दि. २२) समृद्धीच्या १० हजार मे. टन गाळप क्षमतेच्या विस्तारीकरण प्रकल्पाचा हजारो ऊस उत्पादक शेतकरी व कामगार यांच्या हस्ते मोठ्या भूमिजन सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी सतीश घाटगे यांनी विधानसभा निवडणूक लढण्याचा निर्धार पुन्हा एकदा जनतेसमोर जाहीर केला. ज्या पद्धतीने साखर कारखानदारीत ‘समृद्धी’ने परिवर्तन केले, उस उत्पादक शेतकऱ्यांना भयमुक्त केले. त्याच पद्धतीने जनतेच्या साथीने आगामी विधानसभा निवडणूक घन सावंगीत राजकीय परिवर्तन करणार असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अंबड - घनसावंगी तालुक्यात उसाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. येणाऱ्या काळात अतिरिक्त उसाचा प्रश्न निर्माण होऊ नये तसेच शेतकऱ्यांना भयमुक्त होऊन उसाची लागवड करता यावी म्हणून समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी शेतकऱ्यांसाठी समृद्धी कारखान्याचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. ऊस उत्पादक शेतकरी, उसतोड कामगार व उसतोड यंत्रणेतील कामगारांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले. विस्तारीकरणानंतर समृद्धीची प्रती दिन गाळप



क्षमता १० हजार मे. टन आहे. हा प्रकल्प नोव्हेंबर-२०२५ पर्यंत उभा करण्याचा प्रयत्न समृद्धी कारखाना करणार आहे. या भूमिपूजन सोहळ्यास विजय कामड, गौतम गोलेच्छा, शिवाजीराव बोबडे, बालाजी खोजे, भगवान बर्वे, बाळासाहेब बोरकर, पांडुरंग भांगे, अरुण घुगे, शिवाजीराव कटारे , शिवाजीराव कंटूले, शिवाजी नाना मोरे, राहुल कणके, नामदेव ढाकणे, पांडुरंग खटके, रामेश्वर माने, सर्व संचालक मंडळ, कारखान्याचे सर्व विभागाचे अधिकारी, भाजपचे सर्व नेते पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

२५ वर्षात जे झाल नाही, ते ५ वर्षात करून दाखवणार

प्रस्थापित आमदारांनी २५ वर्षात जनतेला मूलभूत सुविधांपासून वंचित ठेवलं शासनाच्या जनकल्याणकारी योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले नाही म्हणून घनसावंगी येथील प्रत्येक घटकातील जनतेच्या विकासासाठी जे २५ वर्षात झालं नाही ते पाच वर्षांमध्ये करून दाखवीन असा शब्द सतीश घाडगे यांनी उपस्थित शेतकरी वर्गांना दिला. हा शब्द देताना त्यांनी सांगितलं की मी जे बोलतो ते करतो बारामती करायची जबाबदारी आता मी पूर्ण करून दाखवतो असे शब्द त्यांनी आमदार राजेश टोपे यांच्यावर टीका देखील केली.

शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी गोदावरी-दुधनेचा संगम

शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी गोदावरी आणि दुधना नदीचा संगम करणार घनसावंगी विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या जालना त आणि घनसावंगी तालुक्यातील दुष्काळी गावांना कायमचे दुष्काळमुक्त करायचं असल्यास गोदावरीचे पाणी तुटणार आणावच लागेल हे पाणी कसं येणार याची चित्रफित या सोहळ्यात शेतकरी वर्गाला दाखवण्यात आली हे चित्रफित प्रस्तावित गुंज उपसा जलसिंचन योजना वर आधारित होती या चित्रफितीमुळे उपस्थित शेतकरी प्रभावित झाले.

सतीश घाटगे यांच्या ‘व्हिजन’ने शेतकरी प्रभावित

या भूमिपूजन सोहळ्यात सतीश घाटगे यांनी येणाऱ्या काळात शेतकरी, युवक, महिला अशा सर्व घटकासाठी असलेले विकासाचे व्हिजन मांडले. हे व्हिजन पाहून आणि ऐकून सर्व शेतकरी प्रभावित झाले. दुष्काळी गावांसाठी पाणीदार करणाऱ्या त्यांच्या व्हिजनची जालना आणि घनसावंगी तालुक्यात चर्चा सुरु झाली आहे.

पान ६ वरून...

## पंडित-पवारांना पर्याय

वाटपाचा उपक्रम राबवून मदतीला धावून गेले होते. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल आता तालुक्यातील जनतेनेच घेतली असून मयुरीताई तुम्ही उभा रहा, आम्ही मतदार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू म्हणून पाठिंबा दर्शवित आशिर्वाद देत आहेत. तसेच मयुरीताई या उच्चशिक्षित चेहरा आहेत, शिवाय त्यांच्याकडे विकासाची दुरदृष्टी असल्याने मतदारांचा देखील त्यांना उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.

गेवराईचे राजकारण पंडित-पवार या प्रस्थापितांच्या भोवती फिरत आले आहे. यावर्षी देखील हेच पंडित पवार इकडून तिकडून उड्या मारत विधानसभेच्या तिकीटासाठी मारामार करताना दिसत आहेत. मात्र या विधानसभा निवडणुकीत पंडित-पवारांना मयुरीताई खेडकर-मस्के या पर्याय म्हणून समोर आल्या आहेत. मयुरी खेडकर यांनी मागील २ वर्षापासून गेवराई विधानसभा मतदारसंघातील गावोगावी जाऊन गोरगरीबांची सेवा करण्याचे पुण्याचे काम केले आहे. शिवाय सर्वांच्या अडीअडचणी व सुख दु:खात हजर राहत असल्याने त्यांनी तालुक्यातील जनतेसमोर एक आशावादी चेहरा म्हणून एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. मागील दोन वर्षात मोफत आरोग्य शिबिरातून लाखो रुग्णांची तपासणी करुन जवळपास ६ हजार रुग्णांचे विनामूल्य पुणे येथील नामांकित रुग्णालयात उपचार करुन या रुग्णांना दृष्टी देण्याचे पुण्याचे काम केले आहे. त्याचबरोबर हजारो भाविकांना शिर्डी दर्शन यात्रा, तसेच पंढरपूर-तुळजापूर दर्शन घडवलेले आहेत. बाळासाहेब मस्के जिल्हा परिषद सभापती असताना या सर्कलमध्ये कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणत विकास कामे करुन कामाची चुणूक दाखवलेली आहे. त्याचबरोबर स्वच्छता अभियान, आदर्श शिवजयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकरांची भव्य प्रतिकृती रेखाटून उत्सव साजरा केलेला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे प्रस्थापित असलेल्यांना जमत नाही, ते काम मयुरी खेडकर व बाळासाहेब मस्के यांनी करुन दाखविल्याने त्यांच्या नावाची गावोगावी चर्चा असून मतदारांच्या आग्रहाखातर त्या यावेळी गेवराई विधानसभेच्या निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. शिवाय सामाजिक कार्याबरोबरच विकासाची दुरदृष्टी असलेला एक उच्चशिक्षित चेहरा म्हणून मयुरी खेडकर यांच्याकडे पाहिले जात असल्याने त्या पंडित-पवारांना पर्याय ठरु शकतात, असा दृढ विश्वास मतदारांचा निर्माण झाल्याने एकप्रकारे मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मयुरी खेडकर यांना मिळत असल्याचे चित्र आहे.

## २७ ऑक्टोबर रोजी

अशी वैयक्तिक टीकाटिप्पणी करणारी नसावी. कवितेला भाषेचे बंधन नाही, मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी वा अन्य कोणत्याही भाषेत असली तरी चालेल.

सहभागी कवींना जास्ती जास्त दोन कविता सादर करता येतील. कविता सादरीकरण हे संयोजनाकडून दिलेल्या वेळेतच पुर्ण करावे लागेल. कवी संमेलनात सहभागी होण्यासाठी शिक्षक कवींनी आपले नाव व शाळेचे विजय रापतवार (संयोजक)७०३८५८७२४८ या क्रमांकावर नोंदवावीत असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## माजलगाव विधानसभेतील

मुस्लीम समाजाची झाल्याने जरी वंचीत आघाडीने मुस्लिम समाजाला उमेदवारीची संधी दिली असली तरी वंचीत आघाडीच्या उमेदवारास मुस्लीम समाजाचे मतदान दखलपात्र होईल का? नाही याबाबत मात्र शंका उपस्थित केली जात आहे.

जरांगे पाटलांचा राजकीय भुमिकेला मुस्लीम समाजाचा पाठिंबा

मराठा आंदोलक संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांनी भाजपा सरकार विरोधात घेतलेल्या भुमिकेला मराठा समाजाबरोबर मुस्लीम समाजाला देखील मान्य असल्याने माजलगाव विधानसभा मतदारसंघात मनोज जरांगे पाटलांनी घेतलेल्या राजकीय भुमिकेला मुस्लीम समाजाचा देखील पाठिंबा असल्याने याचा फटका माजलगाव विधानसभा मतदारसंघात वंचित आघाडीच्या उमेदवारांस नक्कीच बसणार आहे.

cmyk

# शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी स्थापना केली क्रांतिकारी शेतकरी संघटना

## महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एक नवी संघटना

बुलढाणा : राज्यात होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकारणात नव नवे प्रयोग होत आहेत. तिसऱ्या आघाडीसह रासपने आणि मनोज जरांगे पाटील यांनी महाविकास आघाडीसह महायुतीचे टेन्शन वाढले आहे. याचदरम्यान शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी आपल्या संघटनेची घोषणा मंगळवारी (दि.२२) केली. क्रांतिकारी शेतकरी संघटनेची स्थापना करताना बुलढाण्यातून निवडणुकीच्या मैदानात उरतण्याचा निर्धार तुपकर यांनी केला आहे.

सध्या राज्यात विधानसभा निवडणुकीचे जोरदार वारे वाहत असून जागावाटपावरून महायुती आणि महाविकास आघाडीत रस्सी खेच सुरू आहे. महाविकास आघाडीत काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत मराठवाड्यातील १२ जागांवरून संबंध ताणले आहेत. अशातच शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी बुलढाण्यामधून जाहीर मेळावा सोमवारी घेतला. त्यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेची स्थापना केली. तसेच विधानसभा मिळण्यासाठी सकारात्मक निर्णय होत असेल तर ठीक, नाहीतर आपण आपला निर्णय घेऊ, असा निर्धार तुपकर यांनी केला आहे. दरम्यान, तुपकर यांनी याआधी तिसऱ्या आघाडीत जाण्याची तयारी केली होती. याबाबत प्रहार संघटनेचे नेते आमदार बच्चू कडू आणि तुपकर यांच्यात चर्चा देखील झाली होती. पण माजी खासदार तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेने तिसऱ्या आघाडीत प्रवेश केल्याने तुपकर यांनी काढता पाय घेतला होता.

महाविकास आघाडीकडे जवळीक वाढवताना त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे खासदार अमोल कोल्हे यांची भेट घेतली. यानंतर तुपकर शरद पवार यांच्याकडे उमेदवारी मागतील अशी चर्चा रंगली होती. तर मविआकडे तुपकर यांनी बुलढाणा विधानसभेची मागणी करणारा प्रस्ताव दिला होता.

यादरम्यान पुलाखालून बरेच पाणी गेले असून तुपकर यांनी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकांच्या रिंगणात उतरण्याचा निर्धार केला आहे. तसेच मविआकडे दिलेल्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय होत असेल तर ठीक, नाहीतर निर्णय घेऊ, असे तुपकर यांनी कार्यकर्त्यांना सांगितले आहे. तुपकर यांनी राज्यातील २७ जिल्ह्यात आपल्या शेतकऱ्यांची वोट बँक आहे. यामुळे मविआने त्यांचा निर्णय उद्यापर्यंत कळवावा. तर आपली तयारी झाली असून जेथे आपल्याला संधी आहे तेथे आपण लढू. आम्हाला सन्मानाने सोबत घ्या, लाचारी करणार नसल्याचा इशारा दिला आहे. तर पहिला पर्याय मविआचा, त्यानंतर वंचितचा असून येथेही विचार न झाल्यास आपण स्वतंत्र उभे राहू. सध्या मविआ किंवा वंचित असे दोनच पर्याय असून त्यांच्या निर्णयाची वाट पाहू. अन्यथा कोणाला पाडायचे आणि कोणाला निवडून आणायचे याचा विचार करू. तसेच गनिमी काव्याने निवडणूक लढवावी लागेल, असा इशारा रविकांत तुपकर यांनी मविआला दिला आहे.

# खान्देशात रब्बीत सोयाबीनचे क्षेत्र वाढणार

खानदेशात रब्बी किंवा उन्हाळ सोयाबीनची पेरणी यंदा काहीशी वाढणार आहे. पेरणी ३००० हेक्टरवर होवू शकते. एकट्या जळगाव जिल्ह्यातील पेरणी सुमारे २००० हेक्टरपर्यंत होणार असल्याची माहिती आहे. धुळे व नंदुरबारात रब्बी सोयाबीनची पेरणी फारशी केली जात नाही. या भागात कृत्रीम जलसाठाधारक सोयाबीनऐवजी भुईमुगास पसंती देतात. थंडी अधिक पडेल व सोयाबीनचे उत्पादन घटेल, अशी भीती काही शेतकऱ्यांना आहे. परंतु प्रतिकूल स्थितीतही अनेक शेतकरी सोयाबीनचे चांगले उत्पादन रब्बीत घेत आहेत. नंदुरबार, धुळ्यातील पेरणी स्थिर राहील, असेही संकेत आहेत.

जळगाव जिल्ह्यात उन्हाळ सोयाबीनची पेरणी नोव्हेंबर महिन्यातच सुरू होणार आहे. त्यात कमी कालावधीत येणाऱ्या वाणांना पसंती देण्यात येईल, असे दिसत आहे. पाण्याची अडचण नसल्याने पेरणी वाढणार आहे. इतर पिकांनाही मुबलक पाणी मिळावे यासाठी शेतकऱ्यांनी तुषार सिंचन, ठिबकच्या माध्यमातून सोयाबीनचे सिंचन करण्याचे नियोजन केले आहे. सोयाबीनचे दर यंदा खरिपात अस्थिर आहेत. परंतु सोयाबीन उत्पादन कमी होईल. कारण पावसात पिकहानी होत आहे.

किमान ४१०० व कमाल ४६०० रुपये प्रतिक्विंटलचा दर सध्या आहे. नंतरही दर टिकून राहतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. पेरणीच्या वेळेसही दर ४१०० ते ४५०० रुपये प्रतिक्विंटल, असे होते.

यामुळे सोयाबीनची पेरणी शेतकऱ्यांनी केली. परंतु या महिन्यात दरात सुधारणा झाली असून, दर ४१०० ते ४६०० रुपये प्रतिक्विंटल, असे आहेत.

दर टिकून राहतील व अधिकचा नफा मिळेल, या नियोजनातून शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणीचे नियोजन केले आहे. सोयाबीनची पेरणी धुळे, नंदुरबारात वाढण्याची शक्यता आहे. कारण सर्वच प्रकल्पांत जलसाठा मुबलक आहे.



# बांबू शेती खरेच फायदेशीर ठरते का?

भात, सोयाबीन, कापूस, मका, गहू, ज्वारी, बाजरी,हरभरा ही पारंपरिक पिके परवडत नसल्याने महाराष्ट्रातील शेतकरी या सर्वच पिकांना पर्याय शोधत आहेत. त्यातूनच खरीप हंगामात हळदीचे तर रब्बीत राजम्यासारख्या पिकांचे क्षेत्र वाढत आहे.

पारंपरिक हंगामी पिकांना पर्याय म्हणून फळे-भाजीपाल्याचे क्षेत्रही वाढत आहे. परंतु अलीकडच्या हवामान बदलाच्या आणि अनिश्चित बाजारपेठेच्या काळात द्राक्ष तसेच भाजीपाला पिकेही आर्थिकदृष्ट्या किफायतशीर ठरताना दिसत नाहीत. त्यामुळे त्यांनाही पर्याय शोधले जात आहेत. नाशिक जिल्ह्यातील सुशिक्षित युवा शेतकरी प्रशांत दाते यांनी या भागातील द्राक्ष, भाजीपाला, ऊस अशा नगदी पिकांना फाटा देत बांबू शेतीचा पर्याय निवडला. त्यांनी भारतात आढळणाऱ्या बांबूच्या १४८ दुर्मीळ प्रजातींपैकी ९४ प्रजातींचे संकलन, संवर्धन केले आहे. एवढेच नव्हे तर ते स्थानिक तसेच देशभरातील अनेक शेतकऱ्यांना प्रत्यक्ष बांबू शेतीचे मार्गदर्शनही करतात. त्यांच्या बांबू प्रजाती संकलन कार्याची नोंद 'लिम्का बूक ऑफ रेकॉर्ड'मध्ये झाली आहे.

आज आपण पाहतोय आपली बरीच पारंपरिक पिके, त्यांची देशी वाणं लुप्त झाली, तर काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. यामुळे आपली जैवविविधता धोक्यात येत आहे. अशावेळी एका शेतकऱ्याने ठरविले तर ते अशी दुर्मीळ पिके, वाणांचे जतन-संवर्धन करू शकतो, हे यापूर्वी राहिबाई पोपेरे यांनी बीज बँक करून तर प्रशांत दाते यांनी 'दाते बांबू शेतम'



अशा नावाने संग्रहालय करून दाखविले आहे. छंदातून होत असलेल्या या कार्याला व्यावसायिक रुपही देता येते, हा आदर्श त्यांच्या कार्यातून ग्रामीण भागातील युवकांनी घेतला पाहिजे. पारंपरिक पिके, त्यांचे वाणांबरोबर निसर्गातील प्रत्येक वनस्पती-पशु-पक्षी-प्राणी-जीवजंतू अशा जैवविविधतेचे जतन-संवर्धन झाले पाहिजेत. असे झाले तरच आपली जैवविविधता टिकेल.

बांबू लागवडीसाठी कोणत्याही प्रकारची जमीन चालते. अत्यंत कमी पाणी, कमी खर्च, कमी देखभालीत बांबूची व्यावसायिक शेती करता येते. बांबूची एकदा लागवड केली की तिसऱ्या-चौथ्या वर्षापासून उत्पादन सुरू होऊन हे पीक ५० वर्षे उत्पादन देत राहते. फळे-भाजीपाला पिकाला आधार देण्यापासून ते चटया, टोपल्या, दागिने, कांडी कोळसा, फर्निचर, भेटवस्तू, बांबू पल्पपासून कागद, वस्त्रनिर्मिती केली जाते. बांबूपासून जवळपास २००० वस्तू तयार करता येतात. सध्या भारतातून अनेक देशांत बांबूचे विविध मूल्यवर्धित पदार्थ निर्यात केले जातात. असे असले तरी आपल्या देशात या पिकाकडे अजूनही व्यावसायिक पीक म्हणून पाहिले जात नाही. बांबू प्रजाती संवर्धनाबरोबर त्यांची व्यावसायिक लागवड, त्यावर मूल्यवर्धन वाढले तर यातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊ शकते. चीनमधील शेतकऱ्यांनी तर बांबूचा वाया जाणारा भुसा, तुकड्यांचा पुरेपूर वापर करून संपूर्ण बांबू उद्योगाचे अर्थशास्त्र बदलून टाकले. चीनमधील तज्ज्ञांनी बांबूची पाने, फांद्यांपासून औषध उद्योगात वापरली जाणारी रसायने शोधून त्यांचे व्यापारी उत्पादन सुरू केले. आपल्या देशातही बांबू हा उत्तम रोजगारनिर्मिती करू शकतो. बांबूची उपयोगिता व भविष्यातील गरज पाहता रोपनिर्मितीपासून ते मूल्यवर्धनापर्यंत व्यापक कौशल्य विकासाची गरज आहे. युवकांनी कौशल्य प्राप्त केल्यानंतर त्यांना आर्थिक पाठबळही द्यावे लागेल, असे झाले तर या देशातील शेती आणि रोजगारनिर्मितीला बांबूचा भक्कम आधार मिळू शकतो.


# करडई लागवडीचे सुधारित तंत्रज्ञान

करडई हे पीक कमी पाण्यात, कमी खर्चात जास्त उत्पादन देणारे आणि अवर्षणाचा ताण सहन करणारे पीक आहे. करडईची सोटमुळे जमिनीत खोलवर जातात. जास्त खोलीवरील ओलावा व अन्नद्रव्ये शोषून घेतात.

करडई पिकाचे विशेष महत्त्व : करडईच्या तेलात संपृक्त स्निग्ध आम्लाचे प्रमाण इतर तेलापेक्षा बरेच कमी आहे. त्यामुळे रक्तातील कोलेस्टेरॉलची मात्रा प्रमाणाबाहेर वाढत नाही. हृदयरोग्यांसाठी हे तेल उपयोगी आहे. मानवी शरीरातील रक्ताभिसरणाच्या कार्यक्षमतेवर करडईच्या पाकळ्यांचा चांगला परिणाम होतो. रक्तवाहिन्यांमध्ये रक्तपुरवठा तसेच रक्तामध्ये प्राणवायू मिसळण्याचे प्रमाण वाढून रक्त वाहिन्यात गुठळ्या होण्याचे प्रमाण कमी होते. मणक्याचे विकार, मानदुखी, पाठदुखी इ. वर करडई पाकळ्या व त्याचा काढा अन्य आयुर्वेदिक औषधांसोबत उपयोगी ठरतो.

जमीन : करडई पिकाच्या लागवडीस मध्यम ते भारी (खोल) जमिनीची निवड करावी. ४५ सें.मी.पेक्षा जास्त खोल जमिनीत पीक चांगले येते. त्याचप्रमाणे जमीन पाण्याचा चांगला निचरा होणारी असावी. पाणी साठून राहिल्यास करडईच्या पिकास अपाय होतो. थोड्याफार चोपण जमिनीतही हे पीक येऊ शकते. पूर्वमशागत : भारी जमिनीत तीन वर्षांतून एकदा खोल नांगरट करावी व हेक्टरी ५ टन शेणखत टाकावे. दोन ते तीन कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी.

सुधारित वाण : अ.क्र.- सरळ वाण-कालावधी (दिवस) -उत्पादन (क्विं./हे.)-विशेष गुणधर्म सरळ वाण - १.-भीमा-१३०-१३५-१३-१५-कोरडवाहू क्षेत्रास योग्य २.-फुलेकुसुमा-१३५-१४०-१४-१६-कोरडवाहू तसेच संरक्षित पाण्याखाली योग्य. ३.-एस.एस.एफ.६५८-११५-१२०-१२-१३-बिगर काटेरी, अखिल भारतीय स्तरावर लागवडीसाठी योग्य. ४.-एस.एस.एफ.७०८-११५-१२०-कोरडवाहू १३-१५ बागायती २०-२२ --पश्चिम महाराष्ट्रात लागवडीसाठी योग्य कोरडवाहू तसेच बागायती.



५.-फुले करडई-७३३-१२०-१२५-१३-१५-कोरडवाहू लागवडीसाठी

६.-फुले चंद्रभागा (एस.एस.एफ.७४८)-१३०-१४०-कोरडवाहू १३-१५ बागायती २०-२२ कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी.

७.-फुले नीरा (एस.एस.एफ.१२-४०)-१२०-१२५-कोरडवाहू १३-१५ बागायती २०-२२-तेलाचे प्रमाण अधिक(३२.९ टक्के), अखिल भारतीय स्तरावर कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी. ८.-फुले भिवरा (एस.एस.एफ.१३-७१)-१२०-१२५-कोरडवाहू १५-१६ बागायती २२-२५-अखिल भारतीय स्तरावर कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी योग्य, मर रोग व मावा किडीस मध्यम प्रतिकारक. ९.-फुले गोल्ड (एस.एस.एफ.१५-६५)-१२०-१२५-कोरडवाहू १५-१७, बागायती २०-२२-तेलाचे प्रमाण अधिक (३४.६ टक्के), भारतीय स्तरावर कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी. १०.-फुले किरण (एस.एस.एफ.१६-०२)-१२५-१३०-कोरडवाहू १५-१७ बागायती २०-२५-तेलाचे प्रमाण ३०.५%,अखिल भारतीय स्तरावर कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी. ११.-पी.बी.एन.एस. १२-१३५-१३७-१२-१५-अखिल भारतीय स्तरावर कोरडवाहू तसेच बागायती लागवडीसाठी योग्य, मावा किडीस मध्यम प्रतिकारक.

पेरणीची वेळ : कोरडवाहू करडईची पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत करण्याची शिफारस आहे. बागायती पेरणी ऑक्टोबरअखेरपर्यंत करू शकतो. उशिरा पेरणी केल्यास (ऑक्टोबरचा दुसऱ्या आठवड्यानंतर) पीकवाढीची अवस्था थंडीच्या काळात येते. या काळात माव्याचा प्रादुर्भाव वाढतो. उत्पादनात घट येते.

पेरणीचे अंतर : कोरडवाहू क्षेत्रात दोन ओळींतील अंतर ४५ से.मी. आणि दोन रोपांतील अंतर २० से.मी. ठेवावे. बियाणे : प्रति हेक्टरी १० ते १२ किलो बियाणे पुरेसे होते. बीजप्रक्रिया : बियाण्यापासून तसेच जमिनीतून उद्भवणाऱ्या बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणासाठी पेरणीपूर्वी करडईच्या बियाण्यास ट्रायकोडर्मा या जैविक बुरशीनाशकाची ५ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. ॲझोटोबॅक्टर हे जिवाणू संवर्धक २५ ग्रॅम अधिक पी.एस.बी. २५ ग्रॅम प्रति किलो या प्रमाणात बियाण्यास चोळावे. त्यामुळे अनुक्रमे हवेतील नत्राचे स्थिरीकरण होते आणि स्फुरदाची उपलब्धता वाढते.

आंतरपीक पद्धत : हरभरा + करडई (६:३) आणि जवस +करडई (४:२) या आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा.

रासायनिक खते : करडई हे पीक रासायनिक खतास चांगला प्रतिसाद देते. ५० किलो नत्र (११० किलो युरिया) आणि २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी देणे आवश्यक आहे. ही खते पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावीत. बागायती करडई पिकास ७५ किलो नत्र (१६३ किलो युरिया) + ३७.५ किलो स्फुरद (२३५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी द्यावे.

आंतरमशागत : उगवणीनंतर १० ते १२ दिवसांनी या पिकाची विरळणी करावी. विरळणी करताना चांगली जोमदार रोपे ठेवावीत. दोन रोपांमधील अंतर २० से.मी. ठेवावे. रब्बी हंगामात गरज असल्यास एखादी खुरपणी करावी. दोन ते तीन कुळवाच्या पाळ्या देऊन घ्याव्यात. पहिली कोळपणी तिसऱ्या आठवड्यात फटीच्या कोळप्याने, दुसरी कोळपणी ५ व्या आठवड्यात अखंड पासेच्या कोळप्याने व तिसरी कोळपणी ८ व्या आठवड्यात दातेरी कोळप्याने करावी.

पाणी व्यवस्थापन : करडई पिकाच्या वाढीस कमी पाणी लागते. मध्यम ते भारी जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास करडईच्या पिकास पेरणीनंतर पाणी देण्याची गरज भासत नाही. कालांतराने ओलावा कमी झाला आणि पाणी देण्याची सोय असेल तर पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी जमिनीस तडे जाण्यापूर्वी एक संरक्षित पाणी देणे अधिक चांगले. दुसरे पाणी पीक फुलोऱ्यात येताना ५५ ते ६० दिवसांनी द्यावे. पिकास पाण्याचा जास्त ताण पडू देऊ नये. तसेच भेगा पडल्यानंतर पाणी दिले असता पाणी जास्त प्रमाणात जमिनीत मुरते. जास्त पाण्यामुळे पीक मोठ्या प्रमाणात मर रोगास बळी पडते. म्हणून करडई पिकास हलके पाणी द्यावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७०७ : ग्रेट ब्रिटनची पहिली संसदेची बैठक.
१७६४ : मुघल शासक मीर कासीम यांचा बक्सरच्या लढाईत पराभव झाला.
१८५० : अमेरिकेत पहिले राष्ट्रीय महिला हक्क संमेलन सुरु झाले.
१८९० : हरी नारायण आपटे यांनी 'करमणूक' या आपल्या साप्तहिकातून स्फूट गोष्टी लिहिण्यास प्रारंभ केला आणि मराठी लघुकथेचा पाया घातला गेला.
१९०० : इंग्लिश क्रिकेटपटू डग्लस जार्डिन यांचा जन्म. (मृत्यू: १८ जून १९५८)
१९१० : अमेरिकेतील ब्लांश एस. स्कॉट या महिला मदती शिवाय एकट्या विमान उडविणाऱ्या पहिल्या वैमानिक बनल्या.
१९२४ : एडविन हबल यांनी देवयानी ही एक आकाशगंगा आहे असे प्रतिपादन केले.
१९३६ : लाइफ मॅगझिन हे फोटो मॅगझिन म्हणून पुन्हा प्रकाशित झाले.
१९४३ : नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी सिंगापूर येथे आझाद हिंद सेनेच्या अंतर्गत महिलांची 'झाशीची राणी ब्रिगेड' सेनेची स्थापना केली.
१९४४ : दुसरे महायुद्ध सोविएत लाल सैन्याने हंगेरीत प्रवेश केला.
१९४६ : न्यूयॉर्क येथे सयुक्त राष्ट्राची पहिली महासभा पार पडली.
१९४७ : गेर्टी कोरी आणि त्यांचे पती कार्ल कोरी हे पहिले असे दांपत्य होते ज्यांना चिकित्सक क्षेत्रातील नोबल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होत.
१९५५ : कोकोज आयलंड्स या बेटांचा ताबा इंग्लंडकडून ऑस्ट्रेलियाकडे देण्यात आला.
१९७१ : चीनने संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत प्रथमच भाग घेतला.
१९७३ : संयुक्त राष्ट्रांनी निर्बंध घातल्यामुळे इस्त्रायल व सीरीयामधील युद्ध संपुष्टात आले.
१९९२ : आयबीएम सायमन हा पहिला स्मार्टफोन प्रकाशित करण्यात आला.
१९९७ : सामाजिक कार्यासाठीचे जर्मनीचे योजेफ ब्यूज पारितोषिक किरण बेदी यांना प्रदान
१९९९ : नागपूरचे संस्कृत महाकवी व संस्कृत पत्रकार डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर यांना या क्षेत्रातील कठोर तपश्चर्येबद्दल अप्पाशास्त्री राशिवडेकर पुरस्कार प्रदान.
२००४ : जपान येथे आलेल्या भूकंपामुळे सुमारे ८५ हजार नागरिक बेघर झाले होते.
२०१९ : भारतीय वायू दलाने जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या दोन ब्राह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७८ : चन्नम्मा कित्तूरची राणी (मृत्यू: २१ फेब्रुवारी १८२९)
१८७९ : शंकर रामचंद्र तथा 'अहिताग्नी' राजवाडे वैदिक धर्माचे पुरस्कर्ते, पाश्चात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञानाचे अभ्यासक, मीमांसक व भाष्यकार (मृत्यू: २७ नोव्हेंबर १९५२)
१८८२ : उद्योगपती वालचंद हिराचंद दोशी यांचा जन्म. (मृत्यू: ८ एप्रिल १९५३)
१८९७ : साहित्य अकादमी पुरस्कार विजेते बंगाली/इंग्लिश लेखक निराद सी. चौधरी यांचा जन्म. (मृत्यू: १ ऑगस्ट १९९९ लॅथबरी रोड, ऑक्सफोर्ड, इंग्लंड)
१८९८ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व केंद्रीय कामगार मंत्री तसचं, आंध्रप्रदेश राज्याचे माजी राज्यपाल खंडूभाई देसाई यांचा जन्मदिन.
१९०० : डग्लस जार्डिन इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: १८ जून १९५८)
१९२३ : लेखक नागनाथ संतराम तथा ना. स. इनामदार यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑक्टोबर २००२)
१९२३ : दामोदर दिनकर तथा मधुकाका कुलकर्णी प्रकाशन व्यवसायात नवनवीन प्रयोगांसाठी ख्याती मिळवलेले प्रकाशक, 'श्री विद्या प्रकाशन'चे संस्थापक (मृत्यू: २२ फेब्रुवारी २०००)
१९२३ : भारतीय-पाकिस्तानी भाषाशास्त्रज्ञ, लेखक आणि विद्वान असलम फारुखी यांचा जन्म. (मृत्यू: १५ जुन २०१६)
१९२४ : 'संगीतभूषण' पं. राम मराठे संगीतकार, गायक व नट (मृत्यू: ४ आक्टोबर १९८९)
१९२५ : भारतीय राज्य राजस्थान चे माजी मुख्यमंत्री व भारताचे माजी अकरावे उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत यांचा जन्मदिन.
१९२६ : आध्यात्मिक गुरू सत्यनारायण राजू ऊर्फ सत्य साईबाबा यांचा जन्म. (मृत्यू: २४ एप्रिल २०११)
१९३० : अभिनेत्री आणि गायिका गीता दत्त यांचा जन्म. (मृत्यू: २० जुलै १९७२)
१९३७ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते देवेन वर्मा यांचा जन्म. (मृत्यू: २ डिसेंबर २०१४)
१९४५ : शफी इनामदार अभिनेते व नाट्यनिर्माते (मृत्यू: १३ मार्च १९९६)
१९५७ : प्रख्यात भारतीय उद्योगपती, समाजसेवक आणि भारतातील सर्वात मोठी टेलिकॉम कंपनी एअरटेलचे अध्यक्ष सुनील मित्तल यांचा जन्मदिन.
१९७४ : भारतीय पत्रकार आणि लेखक अरविंद अडिगा यांचा जन्म.
१९८४ : अभिनेत्री अमृता खानविलकर यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१५ : डब्ल्यू. जी. ग्रेस इंग्लिश क्रिकेटपटू (जन्म: १८ जुलै १८४८)
१९५९ : अभिनेते व निर्माते नटवर्य चिंतामणराव कोल्हटकर यांचे निधन. (जन्म: १२ मार्च १८९१)
१९६२ : भारतीय सर्वोच्च सैन्य शौर्य पुरस्कार परमवीर चक्र सन्मानित प्रख्यात भारतीय लष्कर सैनिक सुभेदार जोगिंदर सिंह यांचे निधन.
१९७० : सिंगापूर देशाचे पहिले अध्यक्ष युसूफ बिन इशक यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १९१०)
१९७३ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित ब्रिटीश भारतीय क्रांतिकारक महिला तसचं, कलकत्ता येथील ४७ व्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा नेली सेनगुप्त यांचे निधन.
१९८९ : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री मरले ओबर्नान यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
१९९९ : अर्थतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या कुमुद सदाशिव पोरे यांचे निधन.
२००० : चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक बाबूराव सडवेलकर यांचे निधन. (जन्म: २८ जून १९२८ सावंतवाडी, सिंधुदुर्ग, महाराष्ट्र)
२०१२ : सुनील गंगोपाध्याय बंगाली कवी व कादंबरीकार (जन्म: ७ सप्टेंबर १९३४)

# काढणीस आलेला कांदा पाण्यावर तरंगु लागला





## कालच्या पावसाने शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान
## स्थळ पंचनामा करून नुकसान भरपाईची मागणी-डॉ.ढवळे

बीड

काल दिवसभर झालेल्या मुसळधार पावसामुळे लिंबागणेश परीसरातील शेतकऱ्यांच्या कांदा पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असुन काढणीस आलेला कांदा पाण्यावर तरंगताना पाहुन शेतकरी हवालदिल झाला आहे. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार नरेंद्र कुलकर्णी,मंडळ अधिकारी अशोक डरपे,तलाठी नेवडे, जिल्हा कृषी अधीक्षक कृषी अधिकारी बाबासाहेब जेजुरकर यांच्या बदलीनंतर अतिरिक्त पदभार स्वीकारलेले साळवे, कृषी सहाय्यक रामेश्वर पेजगुडे, कृषी पर्यवेक्षक राजेंद्र राऊत यांच्याशी फोनवरून संवाद साधत नुकसानीचे व्हिडिओ आणि फोटो पाठवुन तातडीने पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे.

गट नंबर २२१शेतामध्ये अडीच एकर कांद्याची लागवड केलेली असुन एक एकर काढणीस आलेला कांदा कालच्या मुसळधार पावसामुळे पाण्यावर तरंगत असुन जमेल तसा गोळा करत आहोत.

नगर, सोलापूर याठिकाणी कांदा विक्रीसाठी पाठवायचो.परंतु काढणीवर आलेला कांदा पावसामुळे खराब झाल्याने वजनात घट येणे, कांद्याचे आवरण सडणे रात्रभर पावसात कांदा कुजल्याने कांद्याला बाजारात भाव मिळत नाही त्यामुळे संपूर्ण कांदा पिक वाया गेले असुन शासनाने पंचनामा करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी पिडीत शेतकरी आश्रुबा प्रभु कोळपे यांनी केली आहे. शेतकऱ्यांना क्रॉप इन्शुरन्स अप माध्यमातून झालेल्या नुकसानीची माहिती स्वतः भरायची याद्वारे माहिती भरल्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी हे पंचनाम्यासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर येणार आहेत आता ग्रामीण भागातील बहुतांश अडाणी शेतकऱ्यांना याप्रकारे तक्रार नोंदवता येत नसल्याने फोन वरून माझ्याशी संपर्क करतात आणि त्यानंतर मी महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती कळवतो. त्यानंतर पंचनाम्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी येतात.

# वसंतदादा पाटील महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियान



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात २२ ऑक्टोबर रोजी मतदान जनजगृती अभियान उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे होते. याप्रसंगी उपप्राचार्य प्रोफेसर सतिष माउलगे, पदव्युत्तर संचालक प्रोफेसर गणेश पाचकोरे, कमवि उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, प्रा. शेख इरफान, प्रा. विनोद गायकवाड, प्रा. विठ्ठल शिंदे, प्रा. शेख समद उपस्थित होते.

जनजागृती अभियानअंतर्गत महाविद्यालयीन युवकांना मतदार प्रतिज्ञा देण्यात आली. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य हांगे यांनी विद्यार्थ्यांना लोकशाही शासनप्रणालीत मतदानाचे महत्व विषद करत येत्या विधानसभा निवडणूक प्रक्रियेत सर्व मतदारांनी आवर्जून मतदानाचा हक्क बजवावा असे आवाहन केले.

# डॉ ज्योती मेटे यांच्या निर्णयाचे स्वागत-आमटे

## बीडसह महाराष्ट्रात महविकास आघाडीला फायदा होणार

बीड । प्रतिनिधी

स्वर्गीय दिवंगत लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या पत्नी डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी शरदचंद्र पवार साहेब यांच्या हस्ते व खासदार सुप्रियाताई सुळे, जयंत पाटील, मोहिते पाटील यांच्या उपस्थतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या पक्षात प्रवेश केला या निर्णयाचे स्वागत करण्यात येत आहे.

डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रवेशामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार यांच्या सह महाविकास आघाडीला बीड मध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे साहेब यांच्या स्वच्छ प्रतिमा, तज्ञ प्रशासक व विनायकराव मेटे साहेब यांच्या कार्यकर्तृत्वाचा फायदा महविकस आघाडीला होणार आहे डॉ ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या प्रवेशामुळे शिवसंग्राम कार्यकर्त्यात उत्साहाचे वातावरण आहे डॉ ज्योतीताई मेटे यांच्या निर्णयाचे शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, रमेश जगताप, कृष्णा मसुरे, संजय तीपाले, शैलेश सुरवसे, मोहन गव्हाणे, विलास शिरसट,सुधाकर काकडे यांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.

# प्रा. साहेबराव दीक्षित यांना पीएच.डी प्रदान

घाटनांदुर। प्रतिनिधी



येथील वसुंधरा महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग प्रमुख प्रा. साहेबराव ज्ञानोबा दीक्षित यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड ची पीएच.डी पदवी प्रदान केली आहे. प्रा. साहेबराव दीक्षित यांनी महाराष्ट्रातील अन्न प्रशासन मराठवाडा विभागाच्या एक चिकित्सक अभ्यास या विषयावर प्राचार्य डॉ. पिंपळे व्ही.एस. यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाला प्रबंध सादर केला होता. या यशाबद्दल कामधेनू सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष बालासाहेब देशमुख, सचिव व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे अधिसभा सदस्य गोविंदराव देशमुख प्रभारी प्राचार्य डॉ. अर्जुन मोरे महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# शेतकरी आमरण उपोषणाला यश, लेखी आश्वासनानंतर उपोषण मागे

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यामध्ये शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करा, जिनिंग प्रेसिंग फॅक्टरीवर दर्शनीय भागामध्ये कापसाचा दर लिहावा खाजगी कापूस खरेदी करणाऱ्या संस्थांमध्ये वजन काटे शेतकऱ्यांसमोर तपासून खरेदी करावी हमीभावाप्रमाणे शेतकऱ्यांचा माल खरेदी करावा यासह इतर मागण्या साठी दि.२१ रोजी सुरू केलेले उपोषण आज प्रशासनाच्या लेखी आश्वासनावर उपोषण मागे घेण्यात आले.

दि.१५ ऑक्टोबर पासून शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्याचे शासन आदेश असताना प्रत्यक्षात खरेदी न सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन करताच खरेदी विक्री संघाला जाग आली लवकरच खरेदी केंद्र सुरू करणार असल्याचे लेखी दिले

कार्यक्षेत्रातील कापूस खरेदीदार यांनी हमीभावाप्रमाणे शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करावा व धारूर तालुक्यात मंजूर असलेले




शासकीय सोयाबीन खरेदी केंद्र सुरू न झाल्यामुळे शेतकऱ्यांची मोठ्या नुकसान होत होते तात्काळ सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करून शेतकऱ्यांचा माल खरेदी करावा या मागणीसाठी राजेंद्र मुरलीधर तिडके यांनी आमरण उपोषण सुरू केले होते आज बाजार समितीचे सचिव व खरेदी विक्री संघाचे कर्मचाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन दि.०२ नोव्हेंबर २०२४ पासून प्रत्यक्ष सोयाबीन खरेदी करणार असल्याचे खरेदी विक्री संघाने लेखी लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण सोडण्यात आले. यावेळी बाजार समितीचे उपसभापती सुनील शिनगारे, सोळके सचिव खरेदी विक्री संघाचे कर्मचारी व पत्रकार यांच्या उपस्थितीत आंदोलन मागे घेण्यात आले.

# अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये विद्यमान नेतृत्वाला कंटाळलेल्या भाजप-सेनेच्या असंख्य कार्यकर्त्यांनी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करून होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत विजयसिंह पंडित यांना आमदार करण्याचा निर्धार केला आहे. यावेळी अमरसिंह पंडित यांनी सर्व कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये स्वागत करून प्रचारासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित, सभापती मुजीब पठाण, रा.कॉ. अध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, भवानी बँकेचे उपाध्यक्ष हन्नानसेठ, अरुण चाळक, धनंजय बेदरे, किशोर कांडेकर, सरपंच शितल साखरे, दादासाहेब चौधरी, नगरसेवक राधेशाम येवले, युवा नेते पृथ्वीराज पंडित, रणविर पंडित यांच्यासह शेख खाजाभाई, प्रभाकर पिसाळ, संजय मस्के, उत्तमराव सोलाने, दादासाहेब घोडके, अवेज शरीफ, बंटी सौंदरमल, सुभाषराव मस्के, चंद्रकांत पंडित, अशोक पंडित, बप्पासाहेब पंडित, बंडु मोटे, श्रीहरी पवार, जिल्हा बँकेचे माजी संचालक जालिंदर पिसाळ, संतोष आंधळे, सरवर पठाण, सुदाम चव्हाण, मदन लगड, रणजित सराटे, माजी सरपंच सोमेश्वर



गचांडे, धमपाल भोले, विजय सुतार, राहुल बांगर, रजनी सुतार, शेख मन्सुर, कमलाकर हातागळे आदीसह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना विजयसिंह पंडित यांच्या विजयासाठी मतदारांपर्यंत आपण केलेल्या कामांची माहिती पुरवा असे आवाहन केले.

गेवराई विधानसभा मतदार संघामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा गटामध्ये जोरात इनकमिंग सुरु असून माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचा निर्धार करून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत आहेत. चर्मकार महासंघाचे राज्य उपाध्यक्ष रविंद्र बोराडे, माजी सरपंच रघुनाथ राठोड, चर्मकार महासंघाचे तालुकाध्यक्ष प्रभाकर भालशंकर, चर्मकार महासंघ युवा तालुकाध्यक्ष लहुराज लोखंडे, राजेंद्र भालशंकर आदींसह माऊली पाटेकर, सुनिल पाटेकर, मनोहर जगताप, महेश जगताप, लक्ष्मण बोराडे, चंद्रशेखर बोराडे, अमर बोराडे, तन्मय बोराडे, ऋषिकेश बोराडे, अनिकेत बोराडे, सुखदेव गोरे, पांडुरंग बोराडे, राजेंद्र बोराडे, पवन बोराडे, अभिषेक पाटेकर, अक्षय बोराडे, दिपक बोराडे, कमलेश बोराडे, राजेंद्र राऊत तसेच आदींनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश केला.

गोळेगांव तांडा येथील गुलाब चव्हाण, रमेश चव्हाण, नवनाथ चव्हाण, विजय चव्हाण, विष्णू चव्हाण, अमोल चव्हाण, ज्ञानदेव चव्हाण, गणेश चव्हाण, गोरख चव्हाण, बालु चव्हाण, सचिन राठोड, युवराज चव्हाण, लखन चव्हाण, रोहिदास राठोड, शामराव राठोड, अंकुश चव्हाण, बाबु चव्हाण आदींनी तसेच नागझरी येथील कर्णा भुसारे, मदन भुसारे, राजेंद्र भुसारे, बळीराम भुसारे, विष्णूपंत जोगदंड आदींनी व कवडगांव येथील मंगेश घुगे, चांगदेव सानप, जोतिराम खरात, शौकत शेख, कृष्णा सानप, बालाजी घुगे, माऊली सानप, बाबुराव भिसे, बाळासाहेब साबळे आदींनी अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. हरलाल नाईक तांडा येथील रघुनाथ राठोड, प्रकाश राठोड, शिवाजी राठोड, विकास राठोड, राजेश पवार, कुणाल राठोड, हिरामन राठोड, बाळासाहेब राठोड, एकनाथ राठोड, जीवन राठोड, माऊली राठोड तसेच रोकडा येथील अविनाश राठोड, आण्णासाहेब राठोड, विकास काळे, सुनिता साबळे ग्रा.पं.स., निवृत्ती राठोड, अनिल राठोड, गणेश राठोड, विकास चव्हाण, मलसिंग राठोड, रोशन चव्हाण, ज्ञानेश्वर चव्हाण, विनायक जाधव, बाळु साबळे आणि रामुनाईक तांडा येथील गोरख राठोड, गोटीराम राठोड, नवनाथ राठोड, मच्छिंद्र राठोड, अनिल राठोड, मोतिराम राठोड, शंकर राठोड यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहिर प्रवेश केला.

# टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंची विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड



बीड । प्रतिनिधी

शालेय सॉफ्ट टेनिस स्पर्धेत यंग स्टार टेनिस अकॅडमीच्या खेळाडूंचे विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी निवड झाल्याने समाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे.

क्रीडा व युवक संचालनालय पुणे, तथा बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड व जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय शालेय सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धा दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ रोजी चंपावती क्रीडा मंडळ येथे संपन्न झाली. यावेळी उपस्थित जिल्हा क्रीडा अधिकारी विद्यागर, तालुका क्रीडा अधिकारी पंडित, क्रीडा अधिकारी कालिदास होसूरकर व चंपावती क्रीडा मंडळाचे सचिव हनीफ बेग, सॉफ्ट टेनिसचे मार्गदर्शक आतिक शेख इत्यादी मान्यवरांच्या हस्ते जिल्हास्तरीय सॉफ्ट टेनिस बॉलची स्पर्धा संपन्न झाली. यात १४ वर्षे वयोगटात विराज नाईकवाडे यास द्वितीय पारितोषिक, यज्ञसेन तोताडे यास तृतीय पारितोषिक, स्वानंद शेटे यास चौथे पारितोषिक मिळाले. १७ वर्षीय वयोगटात पहिले पारितोषिक आसिफ काझी यास, तिसरे पारितोषिक यशराज भवर यास, चौथे पारितोषिक क्षितिज कोळेकर ला मिळाले. १९ वयोगटात दुसरे पारितोषिक नीलकंठ धांडे यास मिळाले. खेळाडूंनी मिळविलेल्या या यशामुळे त्यांच्यासह प्रशिक्षक शेख आतिक यांचेही अभिनंदन होत असून सर्वांना पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहे.

## मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक :- १५२९/२०२४**

**(मार्फत विधिज्ञ:- श्री ए एन बारगजे)**

अर्जदार : १. पठाण मारुफ खान पि मुस्ताफा खान, वय ४७ वर्षे, धंदा व्यापार, रा. बलभिम कॉलेज, खंदक गल्ली, बीड, ता. जि. बीड, २. पठाण जफर खान पि मुस्ताफा खान, वय ५७ वर्षे, धंदा वय व्यापार, रा. खंदक गल्ली, बलभिम कॉलेज रोड, बीड, ता.जि. बीड ३. पठाण आरेफ खान पि मुस्ताफा खान, वय ५५ वर्षे, धंदा व्यापार रा. खंदक गल्ली, कारंजा रोड, बीड, ता. जि. बीड, ४. पठाण आसेफ खान पि मुस्ताफा खान, वय ५३ वर्षे, धंदा व्यापार रा. बलभिम कॉलेज, खंदक गल्ली, बीड, ता. जि. बीड, ५. खैसर बेगम भ्र. मुस्तफा खान, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम, रा. बलभिम कॉलेज, खंदक गल्ली, बीड, ता. जि. बीड, विरुध्द निरंक प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी नामे मोहम्मद मुस्तफा खान गुलाब खान हे/या दि. २५/०५/२०१६ रोजी आष्टी, ता. आष्टी जि. बीड येथे मयत असुन अर्जदार क्र. ५ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. आज दिनांक:- १९/१०/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख:- २९/११/२०२४

आदेशावरुन
स्वाक्षरीत
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

## तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, आष्टी जि. बीड

**(दंड-विभाग)**

**दूरध्वनी-(०२४४१)२८२५४२**

**क्र.२०२४/दंड/जन्म-मृत्यूनोंदणी/कावि-२५२**

E-mail id : tahsildarasthi@gmail.com

**दि.१४/१०/२०२४**

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे देसुर ता. आष्टी. यांना जाहीर केले जाते कि, अर्जदार श्री. नाना दत्तू भवर रा. देसुर ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांची मुलगी नामे सानिका नाना भवर यांचा मृत्यू दि. ०५/०७/२०१० रोजी मौजे देसुर ता. आष्टी येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्मची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदाराचे कायदेशीर जन्मचे दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१४/१०/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत
**२ कार्यकारी दंडाधिकारी तथा**
**नायब तहसीलदार आष्टी**

# भिमशक्तीने केल्या नुतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बहुजनांच्या न्याय हक्कांसाठी धर्मनिरपेक्षपणे लढणारी संघटना म्हणून भिमशक्तीची सर्वदूर ओळख आहे. भिमशक्तीचे संस्थापक अध्यक्ष खासदार तथा महाराष्ट्र राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे यांनी भिमशक्तीच्या धारूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना रितसर नियुक्तीपत्र देवून निवडी जाहीर केल्या यात धारूर तालुकाध्यक्षपदी सुनिल गायसमुद्रे, महासचिवपदी निखिल सिरसट, शहराध्यक्षपदी उमाकांत सिरसट आणि उपाध्यक्षपदी धिरज गायसमुद्रे यांची नियुक्ती केली आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे सर्वस्तरांतून स्वागत होत आहे.

धारूर येथील आंबेडकरी चळवळीतील तरूण कार्यकर्ते आणि सामाजिक व दलित चळवळी मध्ये कार्यरत आहेत. तसेच चळवळी मध्ये चांगले योगदान देणाऱ्या व बांधिलकी



जोपासत गोरगरीब, गरजू लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी असणाऱ्या युवकांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांच्या नेतृत्वाखाली व भिमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक महासचिव मोहनराव माने, मुंबई प्रदेशाध्यक्ष शशिकांत बनसोडे भिमशक्ती अंधेरी पूर्वचे उद्धव अवचारे यांच्या मार्गदर्शनाखाली भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी भिमराव सरवदे यांनी रितसर नियुक्तीपत्र देवून भिमशक्तीच्या धारूर तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर केल्या यात धारूर तालुकाध्यक्षपदी सुनिल गायसमुद्रे, महासचिवपदी निखिल सिरसट, शहराध्यक्षपदी उमाकांत सिरसट आणि उपाध्यक्षपदी धिरज गायसमुद्रे यांची नियुक्ती केली आहे.

भिमशक्तीच्या धारूर तालुक्यातील नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे बीड जिल्ह्यांतून स्वागत होत आहे. यावेळी प्रशांत वाघमारे, राकेश सिरसट, निखिल गायसमुद्रे, रजनीकांत सिरसट, सचिन वाघमारे, अक्षय वैरागे, बादल सिरसट, बबलू गायसमुद्रे, डोंगरे सर, जिजा सिरसट, अभिजीत गायसमुद्रे, कपिल सिरसट, करण सिरसट, गणेश सिरसट यांच्यासह भिमशक्तीचे प्रमुख पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

खासदार तथा राज्याचे माजी सामाजिक न्याय मंत्री चंद्रकांत हंडोरे यांनी बीड जिल्हा कार्याध्यक्षपदी माझी नियुक्ती करून मोठी जबाबदारी सोपविल्यानंतर मी मागील काही महिन्यांपासून संघटना विस्तारासाठी सातत्याने प्रयत्न करीत आहे. बीड जिल्ह्यात भिमशक्तीची संघटनात्मक बांधणी केली. नवनविन कार्यकर्ते, युवक आणि तरूणांना संघटनेशी जोडण्याचे काम करीत आहोत, त्याचाच एक भाग म्हणून धारूर तालुक्यातील युवकांना विविध पदांवर नियुक्त्या दिल्या आहेत. भविष्यात ही भिमशक्तीची संघटनात्मक बांधणी प्रभावीपणे करून, संघटनेच्या सर्व आजी - माजी पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन भिमशक्तीच्या माध्यमातून चळवळीला बळ व हंडोरे साहेबांना ताकद व युवकांना संधी देण्यासाठी कटिबद्ध आहोत.

cmyk

राज्य लोकतंत्र

बुधवार, दि.२३ ऑक्टोबर २०२४ | ६

# राजेंद्र मस्केंचा शरद पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश

## जिल्ह्यात सामाजिक सलोखा निर्माण करावा लागेल, पवार साहेबांनी केली अपेक्षा व्यक्त

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी परवा भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज थेट मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांच्या साक्षीने जाहीर प्रवेश केला. यावेळी पक्षाचे निरीक्षक माननीय जीवनराव गोरे, पक्षाचे नेते दिलीपराव गोरे, प्रदेश युवती अध्यक्षा सक्षणा सलगर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी संबोधित करताना शरद पवार साहेब म्हणाले की, श्रीयुत राजेंद्र मस्के यांनी पंधरा वर्षांपूर्वी माझ्या बरोबर राष्ट्रवादीमध्ये काम केलेलं आहे. काही राजकीय परिस्थितीमुळे आमच्यामध्ये आणि त्यांच्यामध्ये अंतर पडले. कालचे राजकारण विसरून आता आमच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये सहभागी झाले. त्यांचं निश्चितच स्वागत आहे. श्रीयुत मस्के जीवाभावाचे सहकारी असून विश्वासात घेऊनच निर्णय घेतले जातील. लोकसभा निवडणुकीत जिल्ह्यातील जनतेने खासदार निवडून देऊ आमच्या वर विश्वास व्यक्त केला. निवडणूक लढवण्याची इच्छा अनेकांची असते. लवकरच सर्वांना विश्वासात घेऊन उमेदवार निवडला जाईल. आता कालचे राजकारण विसरून सर्वांनी विधानसभा निवडणुकीत एकत्रितपणे काम करण्याची आणि विजय कमावण्याची नैतिक जबाबदारी प्रत्येक कार्यकर्त्यांनी स्वीकारावी.

जिल्ह्यात जाती-जातीमध्ये निर्माण झालले अंतर कमी करून जातीय सलोखा निर्माण करण्याची अपेक्षा माननीय शरद पवार साहेब यांनी व्यक्त केली. राजेंद्र म्हस्के यांच्या बरोबर त्यांचे सहकारी सर्वश्री



सोमनाथराव माने माजी सभापती प.स., विठ्ठल नाना शिंदे संचालक खरेदी विक्री संघ, बद्रीनाथ जटाळ संचालक मजूर फेडरेशन, कैलास काटे वृद्ध कलावंत जिल्हा समिती सदस्य, माजी जिल्हा परिषद सदस्य भगवानराव बापू गवते, शरद बडगे भाजपा विस्तारक, शफिकभाई काझी अल्पसंख्यांक आघाडी, महेश सावंत अभियंता सेल जिल्हाध्यक्ष, लालासाहेब पन्हाळे कामगार मोर्चा जिल्हाध्यक्ष, शफिक पेंटर अल्पसंख्यांक सेल कामगार मोर्चा, मदन काका मस्के, मोसिन पठाण, सरपंच महादेव नैराळे, सरपंच किशोर शेळके, सरपंच बाळासाहेब वायभट, उपसरपंच पांडुरंग कानडे, सरपंच सुधाकर चव्हाण, कैकाडी समाज जिल्हाध्यक्ष तुकाराम गायकवाड, भाजपा तालुका सचिव गणेश वाणी, उपसरपंच विकास वायकर, माजी सरपंच वसंत गुंदेकर, चेअरमन बाळसाहेब वायभट, अभियंता सेलचे शंकर तुपे, माजी सरपंच अश्विन शेळके, उपसरपंच भागवत खाकरे, माजी सरपंच दादासाहेब खिल्लारे, उपसरपंच शरद घोलप, माजी सरपंच बालाचार्य घोलप, प्रल्हाद धनगुडे, माजी सरपंच रावसाहेब तात्या म्हस्के, उपसरपंच बाबू कदम, माजी सरपंच सचिन आगाम, से.सो. चेअरमन कल्याण पवार, उपसरपंच दामोदर थोरात, अविनाश नवले,अनिल शेळके, सुरेश माने, सचिन मस्के, महादेव बहीरवाळ, रवींद्र कळसाने, अजय ढाकणे, शरद बहिरवाळ, हनुमंत मस्के, युवराज मस्के, संभाजी मस्के, राकेश बिराजदार, बाळासाहेब गात मारुती तिपाले, रसाळ सर, बाबा गव्हाणे, विनय पवार, सुग्रीव डोके, आबा येळवे शिवाजी तुपे, अंकुश खटाने, सुभाष पाटील, महेश दहे, विनोद मुके, हनुमान बहिरवाळ, धनराज गवळी, राहुल गायकवाड, गणेश शेंडगे, लक्ष्मण भिंगले. अन्वर शेख, शेख मतिन, शामराव तुपे, शेलार मामा, उध्दव जाधव, एकनाथ महाकुडे, मच्छिंद्र तकिक, गंगाधर ढोले, राजू पाडंव, अंकुश दादाखीळ, विष्णू दादाखीळ, शिवशंकर गाडे, अरुण घोडके, लक्ष्मण हाटवटे,शिवाजी ढगे, कल्याण काष्टे,उपसरपंच दिलीप दाभाडे, दत्ता दाभाडे, अशोक वाणी, विलास आहेर, प्रल्हाद आहेर, राहुल गायकवाड, गणेश बालगुडे, सचिन शिंदे, शरद वाघमारे, रमेश कवचट, शिंदे प्रशांत यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात मुंबई येथे जाहीर प्रवेश केला आहे.

# उमेदवारासह निवडणूकीविषयी आक्षेपार्ह पोस्ट केल्यास ग्रुप ॲडमिन जबाबदार

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगाने अंभोरा पोलीस अधिक सतर्क झाले असुन व्हॉट्स ॲप ग्रुप, सोशल मिडियावर पोलीसांचा विशेष वॉच असणार आहे.



कोणत्याही उमेदवाराशी संबंधीत, निवडणूकी बाबत किंवा धार्मिक भाषिक तसेच जातीय द्वोष पसरवणाऱ्या आक्षेपार्ह पोस्ट व्हॉट्सॲप किंवा सोशल मिडियातून केल्यास त्यास संबंधीत व्यक्तीसह ग्रुप ॲडमिनला जबाबदार धरण्यात येईल. त्या अनुषंगाने त्याच्याविरूध्द कडक कायदेशिर कारवाई करण्यात येणार असल्याचे अंभोरा पोलीस ठाण्याचे पो.नि.मंगेश साळवे यांनी नोटीसमध्ये म्हटले आहे.

अंभोरा पोलीसांनी सर्व व्हॉट्स ॲप ग्रुप ॲडमिन, सदस्यांसह सोशल मिडिया वापरणाऱ्यांना आज दि २१ रोजी एक नोटीस बजावली आहे. त्यामध्ये म्हटले आहे

की, विधानसभा निवडणूकीची आचारसंहिता लागू आहे. त्या अनुषंगाने सोशल मिडियावर काही निर्बंध घालण्यात आले आहेत. कोणत्याही उमेदवाराशी संबंधीत त्याचे वैयक्तीक, कौटूंबिक, सामाजिक स्तरावर अवहेलना होईल अशा आक्षेपार्ह टिका-टिप्पनी करणे, मजकुर, फोटो (एडिट / मार्किंग)प्रसारीत करणे अथवा आलेल्या एखाद्या पोस्टवर आपले आक्षेपार्ह मत पोस्ट करणे आणि ते पुन्हा फॉरवर्ड करणे त्याचबरोबर मतदाराचे मन ओळविण्यासाठी कोणत्याही धर्माच्या लोकांच्या धार्मिक, भाषिक तसेच जातीत द्वोष पसरविणारे आक्षेपार्ह मजकुर, फोटो, व्हिडीओ (एडिट / मार्किंग)) करून प्रसारीत करणे. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय एकात्मतेला बाधा निर्माण होईल अशा प्रकारचे स्वतंत्र सोशल मिडिया ग्रुप निर्माण करून त्याद्वारे आक्षेपार्ह मजकुर, फोटो, व्हिडीओ (एडिट मार्किंग) करून प्रसारित करणे. कुठल्याही व्हाट्सॲप ग्रुपमध्ये आचारसंहितेचा भंग होईल अथवा दोन गटात वाद होईल अशी पोस्ट अथवा मजकुर, फोटो, व्हिडीओ टाकल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत व्यक्तीसह ग्रुप ॲडमिनला जबाबदार धरण्यात येण्यात असल्याचे पोलीसांनी म्हटले आहे. सर्व व्हॉट्सग्रुप ॲडमिन, सदस्यांनी या सर्व सुचनांचे पालन करणे बंधनकारक असुन या संदर्भात आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास ग्रुप ॲडमिन व संबंधितास जबाबदार धरून त्यांच्याविरूध्द कडक कायदेशिर कारवाई करण्यात येणार आहे. सदरील नोटीस संबंधीत ग्रुप ॲडमिन, सदस्य यांच्याविरूध्द पुरावा म्हणून सदरील नोटीस न्यायालयासमोर सादर करण्यात येईल अशी तंबी देखील अंभोरा पोलीस प्रशासनाने दिली आहे.

# माजलगाव विधानसभेतील वंचित आघाडीचा उमेदवार मुस्लीम समाजाकडूनच नामंजूर

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षांनी आपापल्या परीने उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्न करत आहेत,तर काहींना उमेदवारी मिळाली देखील आहे.माजलगाव विधानसभेसाठी वंचित आघाडीने मुस्लिम समाजातील मायक्रो ओबीसी समाजातील पिंजारी या जातीतील उमेदवाराला पहिल्यांदाच संधी दिली आहे,मात्र वंचीत आघाडीच्या या मुस्लीम उमेदवारीचे मुस्लीम समाजाने स्वागत करण्याऐवजी मुस्लीम समाजातुनच तिव्र विरोध होत असल्याने माजलगाव विधानसभेसाठी वंचीत आघाडीने दिलेला मुस्लीम समाजाचा उमेदवाराच मुस्लीम




**वंचित आघाडीने पहिल्यांदा दिली मुस्लीम समाजातील मायक्रो ओबीसीला उमेदवारी**

समाजाकडुनच नामंजुर करण्यात येत आहे.

माजलगाव विधानसभेसाठी अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या उमेदवारांचा उमेदवारी मिळवण्यासाठी धावपळ होतांना दिसत आहे,तर दुसरीकडे ज्या पक्षांनी उमेदवार जाहिर केले त्याठिकाणी बंडखोरी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही परंतु माजलगाव विधानसभेसाठी वंचित बहुजन आघाडीने माजलगाव विधानसभेसाठी इतिहासात पहिल्यांदाच मुस्लीम ओबीसी (पिंजारी ) उमेदवार जाहिर करुन आता पाच ते साहा दिवस होऊन देखील मुस्लीम समाजाने वंचित आघाडीच्या उमेदवारीचे ज्या पध्दतीने स्वागत व्हायला हावं होतं,त्या पध्दतीने मुस्लीम समाजाकडून उमेदवारीचे स्वागत झालेलं नाही, त्यामुळे माजलगाव विधानसभेतील वंचीत आघाडीने जाहिर केलेला मुस्लीम समाजाचा उमेदवार मंजुर न करता नामंजुरच आहे,अशी चर्चा माजलगाव विधानसभेतील मुस्लीम मतदारांतुन होतांना दिसत आहे.

वंचितला मत म्हणजे भाजपाला मत मुस्लीम समाजाची भावना

वंचित बहुजन आघाडीने माजलगाव विधानसभेसाठी मुस्लीम समाजाला उमेदवारी दिली आहे,मात्र या उमेदवारीने मुस्लीम समाजात मोठ्या प्रमाणात नाराजी असुन वंचित आघाडीला मत म्हणजे भाजपाला मत अशी भावना ◀◀ पान ३ वर

# २७ ऑक्टोबर रोजी शिक्षक कवी संमेलनाचे आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलन पूर्व उपक्रमातर्गत कवी संमेलन २७ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले असून या कवी संमेलनात शिक्षक कवींनी सहभागी व्हावे असे आवाहन मसापचे अध्यक्ष दगडू लोमटे, स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार आणि संयोजक विजय रापतवार यांनी केले आहे. या कवी संमेलनात अंबाजोगाई शहरात राहणाऱ्या सर्व शिक्षकांना सहभाग घेता येणार आहे.

उत्कृष्ट कविता सादर करणाऱ्या तीन कवींचा ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येईल. सादर केल्या जाणाऱ्या कवितांची प्रत




(टाईप केलेली) संयोजकांना द्यावी लागेल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.

सहभागी होणाऱ्या कवींना स्वतःच्या कवितेचे सादरीकरण करावे लागेल. कवितेला विषयाचे बंधन नसेल.

कविता कोणाच्याही धार्मिक-जातीय भावना दुखवणारी अथवा कोणाचे मन दुखावेल ◀◀ पान ३ वर

# पक्षाचे पद घेऊन घरात बसणाऱ्या शुभम डाके याने ३ वर्षात काय दिवे लावले-अभिषेक दिवे

**बीड । प्रतिनिधी**

युवा सेनेचा युवा जिल्हाधिकारी म्हणून ३ वर्ष शुभम डाके कडे पद असताना पदाला शोभेल असे एकही काम केले नाही.म्हणून शुभम डाके याला एक वर्षापूर्वीच युवा सेनेच्या पदावरून काढून टाकले आहे. काल बीड जिल्ह्यातील युवा सेनेच्या पदाधिकारी निवडी जाहीर झालेल्या आहेत. सदर निवडी सन्माननीय पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे साहेब व युवासेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांच्या आदेशाने झालेल्या असून सदर निवडीस हा निष्क्रिय हाप्तेखोर,जुगारी, दारुड्या,मटका,गुटका,रेती असे अवैध धंदे करणारा शुभम डाके पत्रकबाजी करत आहे. पक्षाच्या विरोधात



बोलत आहे हा जर शिवसैनिक असता तर असे वागला नसता अशा निष्क्रिय शुभम डाकेची युवासेना/ शिवसेनेतून तात्काळ हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी युवासेना/ शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केली आहे. शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांच्या बद्दल बोलणाऱ्या या शुभम डाकेची लायकी आहे का.असा संतप्त सवाल युवासेना व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी केला आहे. परमेश्वर सातपुते जिल्हाप्रमुख झाल्यानंतर आष्टी मतदार संघ व माजलगाव मतदार संघामध्ये शिवसेनेची मोठी ताकद उभा राहिलेले आहे व परमेश्वर सातपुते हे अहोरात्र पक्षासाठी मेहनत करत आहेत ते जिल्हाप्रमुख झाल्यापासून काम न करणाऱ्या व पक्षाला फसवणाऱ्या लोकांचे धाबे दणाणले आहे. त्यामुळे शुभम डाके सारख्या व्यक्तीची जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते व पक्षाच्या विरोधात बोलण्याची लायकी नाही.ज्या शुभम डाकेने युवासेना पदाचा दुरुपयोग करून मटका,गुटखा, रेती अशी अवैध धंदे करून व फोन बंद करून घरात दिवसभर झोप काढणाऱ्यांनी आकलेचे तारे उघडण्याची गरज नाही,तरी शुभम डाके याने पक्षविरोधी कारवाया केल्याने त्याला तात्काळ पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी केली आहे.

# केजमध्ये स्कॉर्पिओने मोटारसायकलस्वारास उडविले

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव फाटा ते विडा रोड दरम्यान दुपारी स्कॉर्पिओ आणि मोटरसायकलचा अपघात झाला असून यामध्ये पिंपळगाव येथील अशोक पोपट राऊत हे गंभीर जखमी झाले आहेत.



तालुक्यातील पिंपळगाव येथील अशोक पोपट राऊत (४५) हे आपल्या दुचाकीवरून गावाकडे निघाले असता स्कॉर्पिओ आणि मोटरसायकल ची धडक झाली. यामध्ये अशोक राऊत यांच्या डोक्याला व छातीला गंभीर मार लागला आहे. सदरील घटनेची माहिती कळताच तातडीने अशोक यांना उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. प्राथमिक उपचार करून त्यांना पुढील उपचारासाठी रेफर करण्यात आले आहे. सदरील अपघात हा नेमका कसा झाला ? हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

### वेतन देयके, सण अग्रीम देयके तत्काळ सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

महाकोषवरील सर्व प्रणाली २५ ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपासून क्लाऊडवर वर्ग करण्याची कार्यवाही सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे सर्व कामकाज २६ ते २९ ऑक्टोबर या कालावधीत बंद राहणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी ऑक्टोबर २०२४ चे वेतन देयक व उत्सव अग्रीम देयक उद्या २३ आणि २४ ऑक्टोबर रोजी कोषागारात देयक सादर करावेत,असे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी लहू गळगुंडे यांनी केले आहे.

# परप्रांतीय इसमाचा चाकू भोकसून खून

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील एमआयडीसी भागातील म्हाडा कॉलनीत एका परप्रांतीय इसमाचा चाकू भोकसून खून करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार मध्यरात्री समोर आला आहे. ग्रामीण पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी दिली. दारूच्या नशेत असताना ही घटना घडली असल्याचे कळते.**

ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या एमआयडीसी भागातील म्हाडा कॉलनीत मध्यरात्री समीरभाई भारुत (वय-५० रा. गांधीनगर गुजरात) व चंदनकुमार राऊत (वय-२५ रा. बिहार) यांच्यात दारू पिऊन वाद झाले. या वादाचे रूपांतर थेट खुनापर्यंत गेले. चंदनकुमारने राग न सहन झाल्यामुळे चाकू भोकसून समीरभाई भारुतचा जागीच खून केला. ग्रामीण पोलिसांना घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी धाव घेतली असता आरोपीला त्याच ठिकाणावरून ताब्यात घेण्यात आले.सध्या या खुनाचा तपास सुरु असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी दिली.

# पंडित-पवारांना पर्याय; मयुरी खेडकर गेवराई विधानसभेच्या मैदानात उतरणार

## २ वर्षापासून सामाजिक कार्याचा अखंड यज्ञ; उच्चशिक्षित चेहरा असल्याने मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराईतील प्रस्थापित पंडित-पवारांना पर्याय म्हणून मयुरी खेडकर यांच्या नावाची जोरदार चर्चा होत आहे. दरम्यान त्या गेवराई विधानसभेच्या मैदानात पुर्ण ताकदीनिशी उतरणार आहेत. मयुरी खेडकर-मस्के व बाळासाहेब मस्के या दाम्पत्यांनी गेवराई विधानसभा मतदारसंघात मागील २ वर्षापासून सामाजिक कार्याचा अखंड यज्ञ तेवत ठेवला आहे. मयुरी खेडकर, बाळासाहेब मस्के यांना कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांनी समाजसेवेचे व्रत हाती घेऊन पायाला भिंगरी बांधल्यागत मतदारसंघातील गावोगावी जाऊन मोफत आरोग्य शिबीर घेतली. यामध्ये लाखों रुग्णांची तपासणी केली, शिवाय

### गेवराई मतदारसंघातील सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी लढणार -मयुरी खेडकर

गेवराई तालुक्यात पंडित-पवारांची जाहिगिरी असल्यासारखे त्यांनी आतापर्यंत आमदारकी मिरवली आहे. त्यातून त्यांनी तालुक्यातील जनतेवर अधिराज्य गाजवून जनतेला त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचे काम केलेले असून एकप्रकारची जुलमी राजवट या तालुक्यात पंडित-पवारांची असल्याची परिस्थिती आहे. आतुन एक असलेले पंडित-पवार केवळ जनतेला दाखविण्यासाठी विरोध करतात. अंधारातून हे आपले सर्व नातेसंबंध जोपासतात, हे हुशार झालेल्या जनतेला कळाले आहे. त्यामुळे आता जनतेला बदल हवा आहे, त्यांना त्यांच्या हाकेला धावून येणारा चेहरा हवा आहे. जनतेच्या दारात जाताना त्यांच्या या भावना ते बोलून दाखवत असून पंडित-पवारांची ही जुलमी राजवट हाटवण्यासाठी व सर्वसामान्यांच्या न्याय हक्कासाठी मी लढणार असल्याचे मयुरी खेडकर-मस्के यांनी सांगितले.

अनेकांवर विनामूल्य शस्त्रक्रिया करुन यापूर्वी कोणीही केला नाही असा जनसेवेचा जागर तालुक्यात राबविला. त्याचबरोबर कोरोना सारख्या संकट काळात रुग्णांना विनामूल्य रुग्णवाहिका, औषधी, गोरगरीब ४ हजार कुटुंबांना किराणा साहित्य, भाजीपाला ◀◀ पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार, दि.२३ ऑक्टोबर २०२४ । पान ७

# पुणेकरांसाठी महत्वाची बातमी ! दिवाळी सणानिमित्त शहरातील वाहतुकीत मोठे बदल

पुणे । प्रतिनिधी

दिवाळी सणानिमित्त पुणे शहरातील मध्यवर्ती भागात बाजारपेठांमध्ये खरेदीकरीता ग्राहकांची मोठ्या प्रमाणात होणारी गर्दी लक्षात घेता शहरातील वाहतूक सुरळीत रहावी म्हणून ५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत.

या अंतर्गत शिवाजीनगर वरून शिवाजी रोडने जाणारी चारचाकी वाहने स. गो. बर्वे चौकातून जाणारी वाहतूक जंगली महाराज रस्ता- टिळक चौक या पर्यायी मार्गाने वळविण्यात येत आहे. स्वारगेटवरून बाजीराव रोडने शिवाजीनगरकडे पुरम चौक मार्गे जाणारी चारचाकी वाहने पुरम चौकातून डावीकडे वळून टिळक रोडने एस. पी. कॉलेज



अलका चौक मार्गे इच्छितस्थळी जातील. आप्पा बळवंत चौकातून बुधवार चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. ही वाहने बाजीराव रोडने सरळ पुढे इच्छितस्थळी जातील. फुटका बुरूज वरून जोगेश्वरी चौकाकडे येणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. त्यासाठी इच्छितस्थळी जाण्यासाठी शिवाजी रोडवरुन सरळ पुढे जाणारा पर्यायी मार्ग राहील. शनिपार चौकाकडून तसेच कुमठेकर रोडवरून मंडईकडे जाणारी वाहतूक आवश्यकतेनुसार बंद करण्यात येईल. याकरिता पर्यायी मार्ग म्हणून बाजीराव रोडने सरळ पुढे जाता येईल.

पार्किंग व्यवस्था

दिवाळीसणानिमित्त बाजारपेठेत बाजीराव रोड, शिवाजी रोड, लक्ष्मी रोड, कुमठेकर रोड, केळकर रोड व मंडई या भागात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांनी आपली वाहने बाबू गेनू पार्किंग, मिसाळ पार्किंग, हमालवाडा पार्किंग व साने वाहनतळ याठिकाणी पार्क करावीत, अशा सूचना वाहतूक शाखेचे पोलीस उप आयुक्त अमोल झेंडे यांनी दिल्या आहेत.

# बिबट्याला पकडण्यात दोन दिवसांनंतरही यश नाही

शिरूर । प्रतिनिधी

मुलावर हल्ला करणार्या बिबट्याला पकडण्यात दोन दिवस उलटूनही वन विभागाला यश आले नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे. मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील गोकुळनगर येथे एका सात वर्षांच्या मुलावर दोन दिवसांपूर्वी बिबट्याने हल्ला केला होता.



त्या घटनेमध्ये मुलाचा मृत्यू झाला होता. या घटनेनंतर वन विभागाने तातडीने पिंजरे लावले, परंतु अद्याप बिबट्या सापडलेला नाही. वन विभागाच्या अधिकार्यांनी या परिसरामध्ये अजून पिंजरे लावून बिबट्याला पकडण्यासाठी लवकरात लवकर प्रयत्न करावे, अशी मागणी होत आहे. मुलाचा मृत्यू पाहून आईची अवस्था बिकट झाली आहे. या कुटुंबाला अद्याप शासनाकडून कोणतीच मदत जाहीर करण्यात आली नाही. या कुटुंबाला लवकरात लवकर शासकीय मदत द्यावी, अशीही मागणी आता ग्रामस्थांनी केली आहे.

ही घटना घडल्यापासून ऊस तोडीवरील कामगार देखील ऊस तोडण्यासाठी गेले नाहीत. ऊस तोडायला गेल्यानंतर या कामगारांची मुले तशीच झोपडीवर राहात असतात. त्यांच्याकडे कोणाचेही लक्ष नसते. त्यामुळे या मुलांसाठी एखादी साखर शाळा उभारणे गरजेचे आहे. दरम्यान, या घटनेनंतर लहान मुले शाळेत येण्यासाठी घाबरू लागली आहेत. मजूरदेखील शेतीवर कामासाठी येत नाहीत. ज्या परिसरात ही घटना घडली आहे, त्या भागातील शेतकरीदेखील शेतीवर पाणी देण्यासाठी जात नाहीत. त्यामुळे सगळीकडे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# डबल महाराष्ट्र केसरी अभिजित कटके यांच्या घरी आयकर छापा

पुणे । प्रतिसनिधी

पुण्यातील कोथरूड विधानसभा मतदारसंघात भाजपकडून बंडखोरी करणार असल्याची चर्चा असलेले भाजपचे नेते अमोल बालवडकर यांच्या सासरी म्हणजेच चंद्रकांत कटके यांच्या घरी इन्कम टॅक्सची रेड पडली आहे.

निवडणुकीच्या अनुषंगाने पुण्यात घडामोडींना वेग आला आहे. सोमवारी पुण्यातील खेड शिवापुर टोल नाक्यावर पुणे ग्रामीण पोलिसांनी ५ कोटी रूपये पकडले. तर आज निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असलेल्या इच्छुक उमेदवारांच्या सासरी आयकर विभागाचे छापे पडल्याची माहिती समोर आली आहे. चंद्रकांत कटके त्यांच्या वाघोली येथील घरात अधिकारी पोहोचले आहेत. महाराष्ट्राचा हिंदकेसरी असलेला पैलवान अभिजीत कटके हा अमोल बालवडकर यांचा मेहुणा आहे.





तर कोथरूड मधून विधानसभा निवडणुका लढवण्यासाठी इच्छुक असलेले भाजपचे नेते अमोल बालवडकर यांना मनवण्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट बालवडकर यांची नाराजी दूर करण्यासाठी त्यांच्या घरी भेट दिली होती. मात्र, ते ऐकत नसल्याने ही आयकर विभागाने छापा टाकल्याची चर्चा रंगल्या आहे. अमोल बालवडकर हे पुण्यातील कोथरुड विधानसभा मतदारसंघातुन येणारी निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. मात्र, भारतीय जनता पक्षाने चंद्रकांत पाटील यांचीच उमेदवारी या मतदारसंघातुन जाहीर केली आहे. त्याआधी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमोल बालवडकर यांच्या घरी जाऊन त्यांची समजुत काढण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर भाजपच्या इतर वरिष्ठ नेत्यांनी देखील अमोल बालवडकर यांना माघार घेण्याची सुचना केली होती . मात्र अमोल बालवडकर यांनी ते येणारी विधानसभा निवडणूक लढवणार की नाही हे अद्याप जाहीर केलेले नाही. त्याआधी पडलेल्या या छाप्यामुळे खळबळ उडाली आहे अभिजीतने यापूर्वी एकवेळा महाराष्ट्र केसरी तर दोन वेळा उपमहाराष्ट्र केसरी ठरला आहे. अभिजीत कटके पुण्यातील शिवरामदादा तालमीचा पैलवान आहे. अभिजीतने २०१५ मध्ये युवा महाराष्ट्र केसरीचा मान मिळवला होता. अभिजीतने २०१६ मध्ये ज्युनियर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत कांस्यपदक जिंकले होते.

# लाडकी बहिण योजनेचे श्रेय बारामती लोकसभा मतदारसंघाचेच; सुप्रिया सुळे यांचा दावा

बारामती - लाडकी बहिण योजना सरकारने सुरू केली. याचे श्रेय बारामती लोकसभा मतदारसंघाला द्यावे लागेल. लोकसभा निवडणुकीपूर्वी बहिणी लाडक्या नव्हत्या, मात्र मतदारांनी दणका दिल्यानंतर सरकारला बहिणी आठवल्या, बहिणींशी फार पंगा नको म्हणून सत्तेतील लोकांनी पंधराशे रुपये देऊन बहिणींचे प्रेम विकत घेण्याचा प्रयत्न केला आहे, अशी जोरदार टीका खासदार सुप्रिया सुळे यांनी केली.

बारामतीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात सुप्रिया सुळे बोलत होत्या. याप्रसंगी विद्या प्रतिष्ठानचे खजिनदार युगेंद्र पवार, एस. एन. जगताप, संदीप गुजर, सत्यव्रत काळे, वनिता बनकर, आरती शेंडगे, पौर्णिमा तावरे, सतीश खोमणे, अशोक इंगुले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, केंद्रात आमचे सरकार येईल तेव्हा शेतीपूरक प्रत्येक गोष्टीवरील जीएसटी शून्य करू. अजित



पवार यांचा नामोल्लेख न करता जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत राज्याच्या अर्थमंत्र्यांनी एकदाही उपस्थिती लावली नाही. त्यामुळे महाराष्ट्राला न्याय कसा मिळणार. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर सरकारच्या पैशाने जाहिराती करायचा नाही, असे विधेयकच आणू, अतिरिक्त खर्च कमी करु, निर्णय घेणाऱ्या लोकांनी जाहिरातबाजी करायची गरजच नाही. आपले युद्ध राज्यातील लोकांशी नसून दिल्लीतील अदृश्य शक्तीशी आहे, योग्य वेळ येताच या राज्यातील जनता त्यांना त्यांची जागा दाखवून देईल असे सुळे म्हणाल्या. धोंड्याच्या महिन्यात जावयाचे पाय धुण्याची प्रथा महाविकास आघाडीचे सरकार आल्यास आपण बारामती मतदारसंघामध्ये बंद करू, त्याऐवजी लेक व जावयाने आई-वडील व सासू-सासर्यांचे पाय धुवावेत अशी प्रथा सुरू करू, असेही त्या म्हणाल्या. या राज्यातील प्रमुख १६०० लोकांनी तुतारीच्या चिन्हावर आमदारकीची निवडणूक लढविण्याची मागणी केली असल्याने उमेदवारांची यादी जाहीर करण्यास काहीसा विलंब होत असल्याचे त्यांनी सांगितले. स्वतः ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या प्रत्येक उमेदवाराची वैयक्तिक मुलाखत घेऊन चर्चा केली आहे.

# त्या पाच कोटींचा वाली कोण ? १६ तास उलटून देखील पाच कोटी प्रकरणात गुन्हा दाखल नाही

खेड । प्रतिनिधी

शिवापुर टोल नाक्यावर सोमवारी संध्याकाळी राजगड पोलिसांनी पाच कोटी रक्कमसह एक वाहन पकडले. मात्र १६ तास उलटून देखील राजगड पोलिसांनी याबाबत गुन्हा दाखल नसल्याने उलट सुलट चर्चा घडत आहे. एकावेळी ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रोख घेऊन जाऊ शकत नसताना देखील राजगड पोलिसांनी अद्याप गुन्हा का दाखल केला नाही हा संशोधनाचा विषय होत आहे.



विशेष म्हणजे हे वाहन पश्चिम महाराष्ट्रातील एका मोठ्या आमदाराशी संबंधित असल्याची माहिती मिळत असल्याने सगळीकडे खळबळ उडाली आहे. मिळत असलेल्या माहितीनुसार पोलिसांनी या प्रकरणात एमएच ४५ -ड २५२६ हे वाहन ताब्यात घेतले असून, इनोवा क्रिस्टा ही टोयोटा कंपनीची गाडी ताब्यात घेतली आहे. सागर सुभाष पाटील (वय ३७) रफिक अहमद नजीर अहमद नदाफ वय५०), बाळासो आणासो आसबे( वय ५१), शशिकांत तुकाराम कोळी (वय ३४ )(सर्व रा. सांगोला ( जिल्हा सोलापूर ) अशी गाडीत आढळल्यांची नावे आहेत. मात्र गुन्हा दाखल न करता केवळ स्टेशन डायरीला रक्कम पकडल्याबाबत नोंद केली आहे. नेमकी रक्कम किती होती, ती रक्कम कोणाला देणार होते. याबाबत तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितलं. राजगड पोलिसांच्या कडून कोणतीच माहिती न देता पकडलेले इसमांना कोठे ठेवले हे बाब गुलदस्त्यात आहे. राजगड पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहे असा आरोप आता विरोधकांमधून होत आहे.

# पुण्यात काल ५ कोटींच्या नोटा सापडल्यानंतर आज आणखी एका कारमध्ये मोठं घबाड सापडलं, हडपसर पोलिसांची मोठी कारवाई

पुणे । प्रतिनिधी

पुण्यात सोमवारी (दि.२२) एका बड्या नेत्याच्या कारमध्ये ५ कोटींच्या नोटा सापडल्या होत्या. ही घटना ताजी असतानाच आता पुण्यात आणखी एका कारमध्ये मोठं घबाड सापडलं आहे. पुण्यातील हडपसर पोलिसांची मोठी कारवाई केली आहे. नाकाबंदीच्या वेळेस आज (दि.२२) संध्याकाळी पोलिसांना एका गाडीत तब्बल २२ लाख ९० हजार रुपये रोकड सापडली आहे. दौंड होऊन पुणे मार्केट यार्ड या ठिकाणी गाडी जात होती. पोलिसांनी या गाडीची झडती घेतली असता २२ लाख ९० हजार रुपये रोकड या गाडीत आढळून आले आहेत. पोलिसांनी विचारपूस केली असता हा एक व्यापारी असल्याचे समजले आहे. कामानिमित्ताने तो मार्केट यार्ड या ठिकाणी चाललोय, असं



व्यापाऱ्याने सांगितलं.

पोलिसांकडून आयकर विभाग आणि निवडणूक आयोगाला पाचारण

दरम्यान, या रकमेबद्दल कुठलंही समाधानकारक उत्तर या व्यापाऱ्याकडून मिळालेला नाही. या २२ लाख ९० हजार रुपयांबद्दलची कुठली स्पष्टता पोलिसांना मिळाली नाही. त्यामुळे पोलिसांनी या संदर्भातील माहिती आयकर विभाग आणि इलेक्शन कमिशन यांना दिले आहे. पुणे पोलिसांकडून पुढील कारवाई सुरू केली आहे. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभा निवडणूक असताना आणि आचारसंहिता लागू झालेली असताना कारमध्ये पैसे सापडत असल्याने विरोधी पक्षांकडून जोरदार टीका करण्यात येत आहे.

रोहित पवारांचे गंभीर आरोप

सहा ते सात गाड्या होत्या, हा विषय नवीन असताना दुसरी माहिती समोर येते. पैशाचा इतक्या मोठ्या प्रमाणात वापर हे सरकार करणार आहे. लोक पैशाला नाकारातील. महायुतीमध्ये असलेल्या एका नेत्यांची अडचण दुसरा नेता करतो, की काय अस वाटतंय. लोकांसमोर सत्य येतंय की हे पैसे वाटणार आहे. अजून ३० दिवस जायचे आहेत. लोकसभेत त्यांनी पैसे वाटले पण जनतेने पैशाला नाही तर महाविकास आघाडी सरकारला प्राधान्य दिले. महायुतीचा विश्वास लोकांवर राहिलेला नाही म्हणून ते पैसे वाटतात.

झाडीडोंगरातल्या गाडीसंदर्भात मित्र पक्षानेच मित्राचा घात केला असल्याचे समजत आहे. ज्या ३०-३५ लोकांना पहिला हप्ता दिला गेला त्यांना आता वाहतूक करताना विशेष काळजी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत, तर काहींना वशश्रळींशी ीं होश करू असं देखील सांगण्यात आलंय , याची पोलीस यंत्रणांनी नोंद

# शेतकरी संघटना विधानसभेच्या निवडणूक रिंगणात



पुणे । प्रतिनिधी

राजकीय पक्ष म्हणजे टोळ्या आणि त्यांचे पदाधिकारी म्हणजे टोळ्यांचे नायक अशी कडक टीका करत शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रघुनाथ पाटील यांनी शेतकरी संघटना स्वतंत्रपणे विधानसभेची निवडणूक लढणार असल्याचे जाहीर केले. ग्राहक चळवळ व सरपंच परिषद यांनी संघटनेला पाठिंबा दिला आहे. असे सांगत पाटील यांनी ७ उमेदवारांची पहिली यादीही जाहीर केली.

ग्राहक चळवळ आणि सरपंच परिषद या संघटना आमच्याबरोबर आहेत. अन्य समविचारी संघटनाही बरोबर येत आहेत. असे पाटील यांनी सांगितले. यावेळी ग्राहक चळवळीचे शिवाजी खेडकर, सरपंच परिषदेचे दत्ता काकडे, अजितराव काळे, पांडुरंग रायते त्यांच्यासमवेत होते. खेडकर यांनी ग्राहक चळवळ शेतकरी संघटनेच्या बरोबरीने विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले. पाटील म्हणाले, सध्याची राज्याची राजकीय स्थिती अतिशय दुर्दैवी आहे. शेतकर्यांच्या आत्महत्या या विषयावर एकही राजकीय पक्ष बोलायला तयार नाही. शेतकर्यांच्या कर्जाविषयी यांना काहीही देणेघेणे नाही. फुकट पैसे वाटणार्या योजना निवडणूक डोळ्यासमोर ठेवून जाहीर केल्या जात आहेत. शेतकरी कुटुंबे मात्र कर्जाच्या ओझ्याखाली जगत आहेत. शेतकरी संघटना ही स्थिती पाहूच शकत नाही. त्यामुळेच सर्व सहकार्यांना बरोबर घेत निवडणूकीत उतरण्याचा निर्णय घेतला आहे.

संघटनेचे सात उमेदवार जाहीर

अकोट- लक्ष्मीकांत कौठेकर, पाथरी - मोहन मानोल, इंदापूर- ॲड. पांडुरंग रायते, कराड उत्तर- वसीम इनामदार, करवीर-ॲड. माणिक शिंदे, हातकणंगले- डॉ. प्रगती चव्हाण, पलुस कडेगाव-परशूराम माळी या उमेदवारांचा समावेश आहे.

# पुण्यात भूमी अभिलेख उपअधीक्षकांना ७५ हजारांची लाच घेताना एसीबीकडून अटक

शिरवळ: खंडाळा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक उर्मिला अशोक गलांडे (वय ४७) आणि त्यांच्या कार्यालयातील कंत्राटी प्रशिक्षणार्थी स्विटी उर्फ साक्षी शिवाजी उमाप (वय २८) यांना लाच प्रकरणात अटक करण्यात आली आहे. या घटनेमुळे महसूल विभागात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने लोणंद येथील सिटी सर्व्हे नंबर १७७/४२८ या मिळकतीवरील सत्ता प्रकार बदलण्यासाठी अर्ज सादर केला होता, ज्यासाठी उपअधीक्षक गलांडे यांनी १,००,०००/- रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडीनंतर रक्कम ७५,०००/- ठरविण्यात आली.

तक्रारदाराने या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी नियोजित सापळा रचून कंत्राटी प्रशिक्षणार्थी स्विटी उमाप यांना ७५,०००/- रुपये लाच स्वीकारताना रंगेहात पकडले. यानंतर उपअधीक्षक उर्मिला गलांडे आणि स्विटी उमाप यांच्या विरोधात खंडाळा पोलीस ठाणे, जिल्हा सातारा येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर कारवाई पोलीस उप-अधीक्षक राजेश वसंत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून, यामध्ये पो.हवा. नितीन गोगावले, पो.कॉ. विक्रमसिंह कणसे, म.पो.कॉ. स्नेहल गुरव, आणि चा.पो.हवा. अजित देवकर यांनी सहभाग घेतला.

पोलीस हवालदाराला ५ हजारांची लाच घेताना अटक

अपघात प्रकरणात कायदेशीर कारवाई न करण्यासाठी पाच हजारांची लाच घेणाऱ्या पोलिस हवालदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई पुनावळे येथे करण्यात आली. ज्ञानदेव तुकाराम बगाडे (वय ४४) असे लाच घेणाऱ्या पोलिसाचे नाव असून ते रावेत पोलिस ठाण्यात हवालदार पदावर कार्यरत आहे. याप्रकरणी ५७ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे.

तक्रारदार हे व्यापारी असून तक्रारदार यांच्या मुलाचा आणि एका दुचाकीस्वाराचा पुनावळे येथे अपघात झाला होता. त्याबाबत एमएलसी झाल्यानंतर हवालदार बगाडे यांनी या अपघात प्रकरणी जबाब नोंदवून अपघात मिटवून देण्यासाठी व तक्रारदार यांच्या मुलावर कायदेशीर कारवाई न करण्यासाठी बगाडे यांनी तक्रारदार यांच्याकडे पाच हजाराची लाच मागितली. याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने याबाबत पडताळणी करून पुनावळेतील गंधर्व हॉटेलसमोर सापळा रचला. तसेच पाच हजारांची लाच घेताना बगाडे यांना रंगेहाथ पकडले. याप्रकरणी रावेत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.